रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २३२
www.ramprahar.com

रविवार, १० मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

भाजपतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान/३
रोह्यातील घेरासुरगड येथे आग; लाखोंचे नुकसान/५
पाचव्या कसोटीत भारताचा डावाने विजय/८

## काँग्रेसमध्ये सुपारीबाज नेते -प्रकाश आंबेडकर



**नवी दिल्ली :** महाविकास आघाडीत अद्याप १५ जागांवरील तिढा सुटलेला नाही. असे असतानाच वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर महाविकास यांनी काँग्रेसमध्ये काही नेते हे सुपारीबाज आहेत, असे खळबळजनक विधान केले आहे तसेच मी लवकरच या सुपारीबाजांची नावे जाहीर करणार आहे, असेही त्यांनी म्हटले. एका वृत्तवाहिनीशी बोलताना आंबेडकर यांनी मी काँग्रेसच्या सुपारीबाज नेत्यांची नावे दोन-तीन दिवसांत जाहीर करणार आहे. त्यांची नावे घ्यायला आम्ही घाबरत नाही. आम्ही रोखठोक आहोत, असे सांगितले. त्याचप्रमाणे महाविकास आघाडीची आजची बैठक रद्द झाली हे आम्हाला सांगण्याची तसदीही कोणी घेतली नाही. तुम्ही बैठक बोलावता, आम्ही येतो. तुम्ही बैठक रद्द करता ते सांगत नाहीत. त्यामुळे आमचे स्थान काय आहे याची आम्हाला कल्पना आली आहे, असे सूचक विधानही त्यांनी केले.

# भाजपकडून लोकसभेचा डिजिटल प्रचार

### मोदी सरकारच्या विकासकामांची दिली जाणार माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई भाजपने प्रचारात आघाडी घेतली असून अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या हस्ते शनिवारी (दि.९) सहा डिजिटल प्रचार रथांना झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. दादर येथील मुंबई भाजप कार्यालयाच्या आवारात प्रचार रथ शुभारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



डिजिटल प्रचार रथाच्या माध्यमातून मुंबईतील सहाही लोकसभा क्षेत्रातील मुंबईकरांपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या विकासकामांची माहिती पोहचवली जाणार आहे. उद्घाटन समारंभास आमदार प्रसाद लाड, महामंत्री संजय उपाध्याय, सर्व नगरसेवक, जिल्हाध्यक्ष आणि पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना मुंबई भाजप अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार म्हणाले, अन्य पक्षांच्या तुलनेत भाजपने प्रचाराच्या सर्वच आघाड्यांवर आघाडी घेतली असून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत भाजप पोहचला आहे.

मुंबईतील महिला बचत गट अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका अशा सर्व घटकांशी संपर्क आणि संवाद साधण्याचे काम सर्वांत आधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात भारतीय जनता पक्षाने केले आहे. कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रत्येक पोलिंग स्टेशनवर सुपर वॉरिअरची सक्षम व्यवस्था उभी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा निवडून आणण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता मेहनत घेत आहे. निवडणूक संचालन समितीच्या बैठका होत आहेत. विरोधक झोपेत असताना भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते झटून कामाला लागले आहेत. मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक संचालन समितीच्या बैठका यशस्वी होत आहेत. योजनांच्या लाभार्थ्यांची संवाद साधला जात आहे.

## पनवेल येथे आज मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यालयांतर्गत मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उद्घाटन रविवारी (दि.१०) दुपारी ३ वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात होणार आहे. या वेळी एनआरआय पोलीस ठाणे व तळोजा पोलीस ठाणे येथील पुरावा व्यवस्थापन कक्षाचेदेखील ऑनलाईन प्रणालीद्वारे उद्घाटन होणार आहे.



या कार्यक्रमास आमदार गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उद्घाटन झाल्यानंतर मान्यवरांकडून या कक्षाचे कामकाज, केस पेपर रूम, रेकॉर्ड कक्षाची पाहणी तसेच ई-पैरवी कक्षाचे कामकाज, सायबर सेलच्या कामकाजाची पाहणी करण्यात येणार आहे. कार्यक्रमस्थळी विविध प्रकल्पांचे स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. यामध्ये डायल ११२, आय बाईक, यथार्थ, नेल्सन सिस्टीम, जागरूक नवी मंबईकर, सायबर/एफआययु, वुमन हेल्प डेस्क, ट्राफीक हेल्प डेस्क स्टॉल्सचा समावेश आहे.

गुन्ह्यातील मुद्देमाल हा पोलीस ठाण्यातील मुद्देमाल कक्षामध्ये ठेवला जात असतो, परंतु पोलीस ठाण्यात पुरेशी जागा नसणे, मुद्देमाल खराब होणे, ओला होणे या सारख्या अनेक समस्यांमुळे मुद्देमाल योग्य पद्धतीने न्यायालयासमक्ष सादर करण्यात अडचणी निर्माण होत असत. हा सर्व मुद्देमाल पोलीस ठाण्यातून स्वतंत्र ठिकाणी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ठेवल्यास जागेची, वेळेची व मनुष्यबळाची बचत होऊ शकते या उद्देशाने नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाची संकल्पना राबविण्यात येत आहे. **(पान २ वर..)**

## पनवेलमधील सात गावांच्या घरमालकांना मिळणार घराखालील जागेचा मालकी हक्क

### आमदार प्रशांत ठाकूर आणि आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते उद्या प्रॉपर्टी कार्डचे वाटप

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेत समविष्ट झालेल्या सात गावांमधील घरमालकांना त्यांच्या घराखालील जागेचा मालकी हक्क मिळणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते ७२५ जणांना सोमवारी (दि.११) प्रॉपर्टी कार्ड अर्थात मिळकत पत्रिकेचे वाटप करण्यात येणार आहे.



महापालिका होण्यापूर्वी ग्रामपंचायत हद्दीत राहणाऱ्या आपल्या पूर्वजांनी आपली घरे गावठाण हद्दीत बांधली होती. त्याच्या नोंदी शासकीय मालमत्ता पत्रकात झालेल्या नसतात. त्यामुळे त्या घरांचा मालकी हक्क वारसांना मिळालेला नसतो. तो मिळावा यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र देऊन मागणी केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी ४ फेब्रुवारी २०२१ रोजी अधिसूचना काढून पनवेल महापालिका हद्दीतील २४ गावांच्या गावठाणांचे भूमापन करण्याचे आदेश दिले होते.

भूमी अभिलेख विभागाने याबाबतचा सर्व्हे सुरू केला आहे. मौजे बीड, तळोजा मजकुर, चाळ, नागझरी, आडीवली, धानसर व करवले बुद्रुक या सात गावांचे गावठाण क्षेत्र मोजण्याचे व चौकशीचे काम पूर्ण झाले आहे. त्यानुसार ७२५ मिळकत पत्रिका तयार करण्यात आल्या आहेत. या मिळकत पत्रिकांचे वाटप तळोजा मजकूर येथील शिव मंदिरात सोमवारी संध्याकाळी ४ वाजता आमदार प्रशांत ठाकूर व महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

### आमदार भास्कर जाधव आज काय बोलणार?

**चिपळूण : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी चिपळूण मतदारसंघातील आपले कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना भावनिक पत्र लिहले आहे. यात त्यांनी सहकाऱ्यांचे ऋण व्यक्त केलेत.

आमदार भास्कर जाधव रविवारी (दि.१०) सकाळी ११ वाजता चिपळूण येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या घडामोडींवर आपली भूमिका पटवून देऊन मन मोकळे करणार असल्याचे या पत्रातून त्यांनी स्पष्ट केले आहे.

## पनवेल भिंगारवाडी येथील शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख तथा पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यशैलीवर आकर्षित होऊन भिंगारवाडी येथील शेकापचे कार्यकर्ते मेघराज अनंत गायकर आणि योगेश वसंत राणे यांनी शनिवारी (दि.९) भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

पनवेल येथील भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनेश ढवळे, भूपेंद्र पाटील, योगेश लहाने आदी उपस्थित होते. पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत झाले.

## निवडक

### हिमाचलमध्ये राजकीय भूकंप; नऊ आमदार उत्तराखंडात दाखल

**शिमला :** हिमाचल प्रदेशमधील राजकीय संघर्ष सुरूच असून अपात्र करण्यात आलेले काँग्रेसचे सहा आमदार उत्तराखंडच्या ऋषिकेश येथे पोहचले असल्याचे सांगितले जाते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या आमदारांबरोबर तीन अपक्ष आमदारही आहेत. हे सर्वजण ऋषिकेशमधील ताज हॉटेलमध्ये मुक्कामी थांबले आहेत. त्यामुळे पुढे काय होणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

### फारूख अब्दुल्लांकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक

**श्रीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक भारतीयाचे प्रतिनिधित्व केले आहे. पंतप्रधान मुस्लिम, हिंदू, शीख, ख्रिश्चन आणि ज्यांचा भारतात कोणताही धर्म नाही अशा लोकांचेही प्रतिनिधित्व करतात. ते आमचे पंतप्रधान आहेत, अशा शब्दांत जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारूख अब्दुल्ला यांनी त्यांचे कौतुक केले आहे. नुकतेच सपा प्रमुख अखिलेश यादव यांनी पंतप्रधान मोदींना उद्देशून वादग्रस्त वक्तव्य केले होते. यानंतर अब्दुल्ला यांनी अखिलेश यांच्या विधानाचा विरोध केला आहे.

## कोयना जल पर्यटनाचा शुभारंभ

### प्रकल्पातून स्थानिकांना रोजगारास प्राधान्य -मुख्यमंत्री

**सातारा : प्रतिनिधी**

कोयना जल पर्यटन केंद्र हे देशातील गोड्या पाण्यातील सर्वांत मोठे जल पर्यटन केंद्र असून या माध्यमातून पर्यावरण पूरक विकास आणि स्थानिकांना रोजगार या बाबींना प्राधान्य देण्यात येणार आहे असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील मुनावळे येथे कोयना जलाशय (शिव सागर) तीर येथे महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाच्या कोयना जल पर्यटन शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी (दि.९) झाला. त्या वेळी आयोजित समारंभात ते बोलत होते. या समारंभास उद्योगमंत्री उदय सामंत, राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, ज्येष्ठ सिने अभिनेते पद्मश्री नाना पाटेकर, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार मकरंद पाटील, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, एमटीडीसीच्या व्यवस्थापक श्रीमती शर्मा, जलसंपदा विभागाचे अरुण नाईक आणि जयंत शिंदे, महाराष्ट्र पर्यटन विकास प्रकल्पाचे सल्लागार सारंग कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सह्याद्रीच्या कुशीत प्रचंड निसर्ग सौंदर्य लपलेले आहे. त्याला चालना देण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती. त्यासाठी ऑफिशियल सिक्रेट अ‍ॅक्ट काढल्याने या परिसराच्या विकासाला चालना मिळाली आहे. मासेमारी, बोटिंग, जल पर्यटन यासाठी या बाबींचा फायदा होणार आहे, मात्र विकास करत असताना तो कोणत्याही परिस्थितीत पर्यावरणपूरक असला पाहिजे. पाणी प्रदूषित होता कामा नये तसेच स्थानिक लोकांना या ठिकाणी रोजगार मिळाला पाहिजे, अशा सूचना पर्यटन विभागाला आपण दिल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले. या कार्यक्रमात स्थानिक तरुणांना प्रातिनिधीक स्वरूपात रोजगाराची नियुक्तीपत्रे देण्यात आली.



### मध्य रेल्वे चालवणार ११२ होळी स्पेशल ट्रेन

**रोहा : प्रतिनिधी**

सणासुदीच्या काळात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने होळी विशेष रेल्वे सेवा चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा फायदा रायगडसह कोकणवासीयांना होणार आहे.

यामध्ये रोहा-चिपळूण अनारक्षित विशेष मेमू (२२ सेवा), पुणे-सावंतवाडी साप्ताहिक वातानुकूलित विशेष (६ फेऱ्या), पनवेल-सावंतवाडी साप्ताहिक वातानुकूलित विशेष (६ फेऱ्या) यांचा समावेश आहे. या गाड्यांसह उत्तर भारतातील प्रवाशांसाठी विशेष गाड्या होळी सणानिमित्ताने सोडण्यात येत आहेत. प्रवाशांनी या विस्तारित सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## राजकारणात संयम महत्त्वाचा -राज ठाकरे

**नाशिक : प्रतिनिधी**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा १८वा वर्धापन दिन शनिवारी (दि.९) पक्षप्रमुख राज ठाकरे यांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये साजरा झाला. या वेळी राज ठाकरेंनी अनेक विषयांवर भाष्य केले तसेच भाजपचे उदाहरण देत राजकारणात संयम महत्त्वाचा असतो, असे सांगितले.

राज ठाकरे म्हणाले की, राजकारणात टिकण्यासाठी सर्वांत मोठी गोष्ट लागते ती म्हणजे पेशन्स. तुमच्या आजूबाजूच्या पक्षांचे यश पाहिले तर लक्षात येईल की, संयम महत्त्वाचा असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली यश मिळवले. यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. १९५२ साली पक्ष स्थापन झाला. जनसंघ १९८०मध्ये, त्याचे भारतीय जनता पक्ष असे नामकरण झाले. अडवाणी, अटलजी, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे असे अनेकजण झटले. अटलजींचे पहिले सरकार १३ दिवसांचे, दुसरे १३ महिन्यांचे, मग साडेचार वर्ष. मनसेनेही १८ वर्षांत अनेक चढउतार पाहिले, चढ कमीच पाहिले उतारच जास्त पाहिले, परंतु यश मिळण्यासाठी संयम हवा.

राज ठाकरे पुढे म्हणाले की, मशिदीवरील भोंगे काढण्यासाठी मी आंदोलन सुरू केले तेव्हा उद्धव ठाकरे सरकारच्या काळात माझ्या १७ हजार कार्यकर्त्यांवर केसेस टाकल्या गेल्या आणि ते लोक स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेत होते. त्या भोंग्यांचा मुस्लीम समाजालाही त्रास होतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी खूप गोष्टी बोलणार आहे. ९ एप्रिलला शिवतीर्थवर सभा घेणार आहे, असे म्हणत लोकसभा निवडणुकीसाठी राज ठाकरे यांनी आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवली आहे.




## कर्जतच्या शेतकऱ्याने घेतले लाल भेंडीचे पीक





**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील एका प्रयोगशील शेतकऱ्याने आपल्या शेतात लाल रंगाच्या भेंडीचे पीक घेतले आहे. याबद्दल स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी या शेतकऱ्याचे कौतुक केले.

रायगड जिल्ह्यात प्रथमच कर्जत तालुक्यातील आर्डे येथील प्रयोगशील शेतकरी नवनाथ शेळके यांनी त्यांच्या शेतात नावीन्यपूर्ण बाब म्हणून लाल भेंडीच्या बियाण्याची प्रायोगिक तत्वावर लागवड केली. उपविभागीय कृषी अधिकारी नितीन फुलसुंदर यांनी केलेल्या विशेष प्रयत्नामुळे हे बियाणे उपलब्ध झाले. पीक आल्यावर शेतकरी शेळके यांनी पहिल्या तोड्यातील उत्पादित भेंडी आमदार महेंद्र थोरवे यांना भेट म्हणून दिली.

### आमदारांकडून कौतुक

आजच्या युगात शेतकरीवर्ग पारंपरिक शेतीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दिसत आहे. आधुनिक शेतीमधून शेतकऱ्याला जास्तीत जास्त उत्पादन मिळते. त्यामुळे शेतकरी आपल्या शेतीत वेगवेगळे प्रयोग करीत असतात, असे सांगून आमदार थोरवे यांनी या वेळी शेतकरी शेळके यांच्या प्रयोगाचे कौतुक केले तसेच कृषी विभागाचे अभिनंदन केले.

या वेळी तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड, मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, कृषी पर्यवेक्षक मंगेश गलांडे, कृषी सहाय्यक विजय गंगावणे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे उद्घाटन

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ

**सातारा : प्रतिनिधी**

महाबळेश्वर तालुक्यातील दरे येथील बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार व वनसंवर्धन प्रकल्पाचे लोकार्पणासह गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी (दि.९) करण्यात आला.

कार्यक्रमास राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बांबू लागवडीस व रेशीम उत्पादन वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी महाबळेश्वर तालुक्यातील दरे तर्फे तांब येथे बांबू मूल्यवर्धन केंद्र आणि टसर रेशीम शाश्वत रोजगार व वनसंवर्धन प्रकल्प साकारण्यात आला आहे. शेतकरी तसेच महिला व युवकांना कृषी व वनउपज उत्पादनासाठी पूरक रोजगार मोठी संधी उपलब्ध होणार आहे. गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत कोयना धरणातील गाळ काढण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री यांचे वडील संभाजी शिंदे यांच्या हस्ते टरस (वन्य) रेशीम शाश्वत रोजगार व संवर्धन प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. जंगल भागातील शेतकरी महिला व युवकांना टरस रेशीम शेती नाविन्यपूर्ण शाश्वत उद्योग आहे. ऐन झाडाची लागवड रोजगार हमी योजनेतून करता येते. कुठेही नांगरण करायचे नाही,पाण्याचे आवश्यकता नाही, औषध फवारणी नाही. त्यामुळे सह्याद्री पर्वत रांगांमधील शेतकऱ्यांसाठी टरस रेशीम शेती एक वरदान ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

दरम्यान, सातारा जिल्ह्यात राज्यात प्रथमच महसूल विभागातील अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पणही करण्यात आले. या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हाधिकारी यांनादेखील ईनोवा गाड्या देण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

# खोपोली विकास योजना सुनावणीस अल्प प्रतिसाद

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका आयोजित सुधारित विकास योजना सुनावनी बैठकीस नागरिकांनी अल्प प्रतिसाद मिळाला.

खोपोली नगर परिषद क्षेत्राची दुसरी प्रारूप विकास योजना



तयार करण्यासाठी नगर परिषदेने सन २०२०-२३ यादरम्यान चा राजपत्रात इरादा जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारूप दुसरी सुधारित विकास योजना तयार करण्याची प्रक्रिया नगररचना विभागातर्फे सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अलीकडेच ७ मार्च रोजी नगर परिषद सभागृहत नागरिकांचे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीतच नागरिकांच्या प्रचंड रोशास नगर रचना विभाग अलिबाग व खोपोली नगर परिषदेला सामोरे जावे लागले या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घाई गर्दीत शनिवारी ९ मार्च व १० मार्च रोजी नगरपरिषद सभागृह त प्रत्येक प्रभागाला ठराविक वेळ देण्यात आला. यासाठी युद्ध पातळीवर पत्रकार जाहीराबाजी व रिक्षाने दवंडी पेटवण्यात आली होती, आज पहिल्याच दिवशी हाळ, तकाई इत्यादी भागातील नागरिकांनी अल्पसा प्रतिसाद दिल्यामुळे आयोजित बैठकीच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# माणगावात मस्जिद मोहल्ल्यातील सभागृहाचे उद्घाटन



**माणगाव : प्रतिनिधी**

आमदार भरत गोगावले यांच्या सहकार्याने व शिवसेना नेते अँड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व वार्डातील नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या पाठपुराव्याने २५ लक्ष रुपयांच्या निधीतून साकारलेल्या माणगाव नगर पंचायत हद्दीतील वार्ड क्र. १७ मधील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील सामाजिक सभागृहाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. ८) जागतिक महिला दिनी महाड, पोलादपूर, माणगावचे आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले.

आमदार गोगावले यांचे जुने माणगाव मस्जिद मोहल्ला याठिकाणी आगमन होताच नगरसेवक दिनेश रातवडकर, मोहल्याचे अध्यक्ष अब्दुल रहिमान हाजिते, उपाध्यक्ष सिराज अफ़वारे व ग्रामस्थांनी स्वागत केले. विकासकामांना कधीही निधीची कमतरता भासू देणार नाही, असे आमदार गोगावले यांनी या वेळी ग्रामस्थांना आश्वासित करताना सांगून वार्डातील नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या कार्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमास शिवसेना नेते ॲड. राजीव साबळे, शिवसेना दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, नगरपंचायतीच्या स्वछता व आरोग्य समिती सभापती शर्मिला सुर्वे, वार्डातील नगरसेवक दिनेश रातवडकर, नगरसेवक कपिल गायकवाड, नगरसेवक सचिन बोंबले, नगरसेविका रिया उभारे, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगर सेवक नितीन बामगुडे, शहर प्रमुख सुनील पवार, नंदिनी जाधव, प्रसाद धारिया, ग्रामस्थ रऊफ जामदार, उमर परदेशी, महम्मदअली धुंद्वारे, अकबर परदेशी, अयुब करवेकर, शब्बीर परदेशी, मुफीद जामदार, नदीम परदेशी, हाफिज ताज, अरमान परदेशी, इकबाल मुल्ला, असिफ आकूस, अन्वर आकूस आदींसह मोहल्ल्यातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी शिवस्वराज्य संघर्ष समितीची स्थापना

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत होराळे व परिसरातील गावातील ग्रामस्थांनी स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी शिवस्वराज्य संघर्ष समितीची स्थापना केली असून या समितीद्वारे स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी समिती प्रयत्न करणार असल्याचे होराळे गावच्या हद्दीत झालेल्या बैठकीत ग्रामस्थांनी इरादा स्पष्ट केला.



(छाया : जयवंत माडे)

या परिसरात अनेक कारखाने असून या कारखान्यात व्यवस्थापक स्थानीक भूमिपुत्रांना डावलून बाहेरील कामगारांना कंपनीत सामावून घेत आहेत. यामुळे या परिसरात दिवसेंदिवस बेरोजगारी वाढत आहे, ही परिस्थिती पाहता हो राळे ग्रामपंचायत हद्दीतील होराळे, परखंडे व झाडांनी इतर गावातील ग्रामस्थांनी एकत्रित येत शिव संघर्ष समिती स्थापन केली असून या समिती त वेगवेगळ्या पक्षाचे प्रतिनिधी नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीद्वारे अलीकडेच विविध कंपन्यांना पत्र देण्यात येऊन इशारा देण्यात आले आहे. स्थानिक भूमिपुत्रांना डावलून तुम्ही अन्याय केला तर, समिती कारखान्यासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे.

अलीकडेच केएन कॉस्मोतिक या कारखान्यात समितीद्वारे पत्र देण्यात आले आहे, असे भाजपचे नागेश पाटील सांगितले.

### होराळे परिसरासाठी पाऊल

होराळे परिसरासाठी आम्ही स्थापन केलेल्या समितीमध्ये प्रत्येक गावातील विविध पक्षांचे १० सदस्य असणार आहेत. केवळ स्थानिक भूमिपुत्रांच्या रोजगारासाठी ही समिती काम करेल, असे भाजप युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष नागेश पाटील यांनी दैनिक रामप्रहरशी बोलताना माहिती दिली.

# महापारेषणमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

महापारेषणच्या वतीने वांद्रे येथील मुख्य कार्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरणावर संवाद स्त्री मनाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी महिलांचा नेहमीच परस्परसंवाद, सुसंवादावर भर असतो. आता त्यांनी आत्मसंवाद, स्वसंवाद वाढविला पाहिजे, असे मत समुपदेशक तथा द लिंक प्रशिक्षण व विकास संस्थेच्या प्रमुख सल्लागार धनलक्ष्मी पटवर्धन यांनी व्यक्त केले. महिलांसाठी विविध उपक्रम व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले होते.

या वेळी महापारेषणच्या मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या वतीने महिला अधिकाऱ्यांना मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे यांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश आंबेकर, राजेश पाटील, सुनील गडलिंग, रेणुका नाटके, सीमा डुबेवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंजिरी तारगावकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार वृषाली राऊत यांनी मानले. दरम्यान, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी महापारेषणच्या प्रगतीत महिलांचा मोठा वाटा असल्याचे सांगून जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

# जेजे स्कूल ऑफ आर्टमध्ये वार्षिक प्रदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

सर ज.जी. कला महाविद्यालय ही दृश्यकलेचे शिक्षण देणारी देशातील एक अग्रगण्य कला संस्था असून २ मार्च रोजी या संस्थेने १६८व्या वर्षात पदार्पण केले आहे. भारतातील दृष्य कलेच्या क्षेत्रात या संस्थेचे खूप मोठे योगदान आहे. वार्षिक कला प्रदर्शन हा विद्यार्थी व संस्थेसाठी महत्त्वाचा उपक्रम असून यामध्ये प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांपासून ते पदव्युत्तर पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या वर्गकामामधून उत्कृष्टच कलाकृती प्रदर्शनामध्ये सादर केल्या जातात. सर जेजे स्कूल ऑफ आर्टच्या मुख्य इमारतीतील तळमजला तसेच पहिला मजला व रे आर्ट वर्कशॉप या इमारतीमध्ये हे संपूर्ण प्रदर्शन लावण्यात आले आहे.



या वार्षिक प्रदर्शनाचे उद्घाटन व पारितोषिक वितरण समारंभ सोमवारी (दि. ११) सायंकाळी ५ वाजता आयोजित केला आहे. या प्रदर्शनात प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध इतिहाच्या अभ्यासक व लेखिका डॉ. फिरोजा गोदरेज व संस्थेचे माजी विद्यार्थी व चित्रकार विलास शिंदे यांची उपस्थिती लाभणार आहे.

१२ मार्च रोजी संध्याकाळी ६ वा विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आणि फॅशन शो चे आयोजन केले आहे. १३ मार्च रोजी संध्याकाळी ६ वा प्रशिध्द शास्त्रीय संगीत गायिका श्रुती सडोलीकर यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहेत. या साठी सर्वांना विनामूल्य प्रवेश देण्यात येईल. १६ मार्च रोजी कलावेध चित्रकला स्पर्धे च्या विजेत्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केली आहे.

प्रदर्शन १२ ते १७ मार्च २०२४ सकाळी १०.३० ते संध्याकाळी ७. या कालावधीमध्ये सर्व रसिकांना विनामूल्य पाहता येईल. या प्रदर्शनासाठी आवश्य भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विविध ग्रामपंचायतींमध्ये महिला दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून खालापूर तालुक्यातील विविध ग्रामपंचायत मधून महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला.

ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. या वेळी सरपंच सौ. पुजा नितिन तवले यांनी मनोगत व्यक्त केले. उपसरपंच रेखा रवींद्र भुईकोट यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्वच ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका, ग्रामपंचायत महिला कर्मचारी, ग्रामपंचायत महीला सदस्य,महिला बचत गटाचे अध्यक्ष, सीआरपी, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रतिभावंत महिला,यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले येथे सरपंच प्रिया प्रफुल्ल विचारे, ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव, ग्रामपंचायतन वावंढळ, ग्रुप ग्रामपंचायत कलोते, ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी येथेही जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी खास कार्यक्रम व सन्मान आयोजित करण्यात आला होता. उपस्थित महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सरपंच रवी कुंभार, सुहास कदम,भारती चाळके, मंगल वाघमारे सुशीला भुईकोट, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब गोल्हार, संभाजी केंद्रे, सचिन कुराडे, निलेश म्हसकर, मंगला केदारे, प्रशांत कदम, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.

**नवी मुंबई : उत्तराखंड समाजाचा कौथीग महोत्सव (वर्ष १५वे) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रामलीला मैदान येथे सुरू झाला आहे. दहा दिवस आयोजित या महोत्सवात विविध सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम होणार आहेत. पारंपरिक स्टॉल्सही येथे मांडण्यात आलेले आहेत. यंदाच्या महोत्सवाची थीम ही राम मंदिरावर आधारित आहे.**



### थंडी, तापाचे रुग्ण वाढले

**पनवेल** : गेल्या काही दिवसांत शहरातील तापमान झपाट्याने वाढत आहे. दिवसा अति उष्ण, तर रात्री वातावरण चांगलेच थंड असते. त्यामुळे नागरिकांना विविध आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खोकला, थंडी आणि ताप यांचे मोठ्या संख्यने रुग्ण सध्या शहरात पाहायला मिळत आहेत.



पान १ वरुन

## पनवेल येथे आज मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

यासाठी परिमंडळ स्तरावर परिमंडळ १ (वाशी)कडील पोलीस ठाण्यांकरिता एनआरआय पोलीस ठाण्याच्या आवारात व परिमंडळ २ (पनवेल)कडील पोलीस ठाण्यांकरिता पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षामध्ये ईव्हीडन्स मॅनेजमेंट सिस्टीम या ऑनलाईन प्रणालीचा वापर करण्यात आलेला आहे.

प्रत्येक पोलीस ठाण्याकरिता स्वतंत्र रॅक व मुद्देमालासाठी स्वतंत्र क्युआरकोड असल्याने मुद्देमाल तत्काळ एका क्लिकवर उपलब्ध होणार असून मुद्देमालाची ताबा साखळी राखली जाणार आहे. यासह तळोजा पोलीस ठाणे आवारात मध्यवर्ती मुद्देमाल व्यवस्थापन वाहने कक्ष येथे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाण्यांकडून गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली वाहने ठेवण्यात येणार आहेत.

# पनवेलमध्ये महाशिवरात्रीनिमित्त सुरमणी धनंजय जोशींचे गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विरूपाक्ष महादेव मंदिर ट्रस्ट, पनवेलतर्फे महाशिवरात्री निमित्त स्वर शंकरा या सांगीतिक मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड येथील सुप्रसिद्ध गायक सुरमणी धनंजय जोशी यांनी पनवेलकर रसिकांना त्यांच्या सुरेल स्वरांनी मंत्रमुग्ध केले.

शिवरात्री उत्सव त्यामुळे जय शंकरा हे सुप्रसिद्ध नाट्यगीत सादर करून धनंजय जोशी यांनी रसिकांची वाहवा मिळवली. मध्यंतरात विरूपाक्ष मंदिर ट्रस्ट तर्फे सर्व मान्यवर



कलाकारांचा सन्मान करण्यात आला. मैफिलीच्या दुसऱ्या भागात धनंजयजी यांनी संतभार पंढरीत, कानडा राजा पंढरीचा, बाजे रे मुरलिया अशी गीते अतिशय उत्तम प्रकारे सादर करून दर्जेदार मैफिल म्हणजे काय ह्याची प्रचितीच दिली.

हार्मोनियम साथ अथर्व देव, तबला साथ आदित्य उपाध्ये, पखवाज सुरज गोंधळी, निवेदन अजित वाराणशीवार आणि तालवाद्य समीर कर्वे यांनी दर्जेदार साथ करून रसिकांची वाहवा मिळवली. किरण बापट यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. अविनाश देव, चंद्रकांत ताम्हनकर यांनीही ही मैफिल यशस्वी होण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. सुप्रसिद्ध तबला वादक महेश कानोले, नागनाथ पाटील, आरती आवटे , विनायक प्रधान, वैशाली कुलकर्णी अशी संगीत क्षेत्रातील मंडळी या मैफिलीसाठी उपस्थित होती.

धनंजयजी यांनी मैफिलीची सांगता तम निषेचा व राम नाम ज्याचे मुखी अश्या गीतांनी करून एक यशस्वी सांगीतिक कार्यक्रम कसा असावा हे उत्तम प्रकारे सिद्ध केले. सर्वेश साऊंडचे सर्वेश गोखले यांनी उत्तम प्रकारे साऊंडची व्यवस्था केली. विरूपाक्ष देवस्थानचे सचिव गुरुनाथ लोंढे व त्यांचे सर्व सहकारी यांनी ही मैफिल आयोजित करून आणि ती यशस्वी होण्यासाठी फार मोठं योगदान दिले.

# भाजपतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

## कर्करोग प्रतिबंध विषयावर मार्गदर्शन; भेटवस्तूंचे वाटप




**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे मंडल व भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा कामोठे मंडल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. या वेळी कर्करोग प्रतिबंध या विषयावर डॉ. ललित पेटकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित सर्व महिलांना व मुलींना भेट वस्तू देण्यात आली.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सभागृह नेते परेश ठाकूर तसेच रवींद्र जोशी भाजपा शहर अध्यक्ष कामोठे, नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, नगरसेविका हेमलता गोवारी, माजी नगरसेविका शिला भगत तसेच भाजप रायगड जिल्हा चिटणीस विद्या तामखेडे, भाजप कामोठे सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, चिटणीस विनोद खेडकर, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, हर्जींदर कौर जी, रश्मी ताई भारतद्वाज, सोनाली खरातमोल, भाजप शिक्षक आघाडीचे संयोजक मनोहर शिंगाडे, भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, या मोर्चा सरचिटणीस प्रवीण कोरडे, उपाध्यक्ष आदित्य भगत, उपाध्यक्ष राहुल बुधे उपाध्यक्ष सागर ठाकरे, सचिव किरण जाधव, सचिव विकास टेकवडे, युवती अपूर्वा सावंत, सोशल मीडिया संयोजक शंकर कारंडे, युवा वॉरियर्स जिल्हा सहसंयोजक आयुष्य केंद्रे युवा वॉरीयर्स कामोठे शहराध्यक्ष सुयोग वाफारे, प्रथमेश सातपुते, अमित गोडसे आदी कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंगेश शेलार यांना आदर्श सरपंच पुरस्कार

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंचे मंगेश शेलार यांना आदर्श सरपंच म्हणून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ग्रामपंचायत हद्दीत उत्कृष्ट काम केल्याबद्दल त्यांना शुक्रवारी (दि. ८) झी २४ तास तर्फे पालक मंत्री उदय सामंत यांचे हस्ते आमदार प्रशांत ठाकूर यांचे उपस्थितीत त्यांचा गौरव करण्यात आला. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.




रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उलवे येथे शुक्रवारी (दि. ८) विकास महाराष्ट्राचा आवाज रायगडच हा कार्यक्रम झी २४ तासने आयोजित केला होता. या वेळी पालक मंत्री उदय सामंत, आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. या कार्यक्रमात करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंचे मंगेश शेलार यांना आदर्श सरपंच पुरस्काराने गौरवण्यात आले. करंजाडे ग्रामपंचायतीच्या स्थापनेपासून ग्रामपंचायतीवर शेकापची एक हाती सत्ता होती, मात्र मागील वर्षी सरपंच मंगेश शेलार यांचे नेतृवाखाली भाजपने शेकापची सत्ता उलथून लावली आणि ग्रामपंचायतीवर भाजपचे ११ पैकी १० सदस्य निवडून आले. सरपंच मंगेश शेलार यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत जिंकून आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून कामाला सुरूवात केली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली कामाचा पाठपुरावा केला.

वर्षभरात करंजाडे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या विकासकामांमध्ये प्रामुख्याने करंजाडे गावातील प्रवेशद्वार, रुग्णवाहिका सेवा, गणेश नगर ते टाटा पॉवर रस्त्याचे कॉंक्रिटी करण डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे सभा मंडप बांधकाम, ग्रामपंचायत हद्दीत ओपन जिम, करंजाडेतील तलावातील गाळ काढणे, गणपती विसर्जन घाट बांधणे, करंजाडे गावात शौचालय बांधणे, शिवमंदिर येथे सार्वजनिक शौचालय बांधणे, सेक्टर ६ करिता १५० एमएलटी पाणी पाईपलाईन जोडण्याचे काम पूर्ण, करंजाडे वसाहतीतील सोसायटीत तसेच ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंचेस, गणेश नगर अंतर्गत गटारे दुरुस्त करणे, गावदेवी आदिवासी वाडी येथे रस्ता कॉँक्रिटीकरण करणे, करंजाडेतील मुकरीची आदिवासी वाडी येथे शौचालय बांधणे, शिवमंदिर रस्त्याचे कॉँक्रिटीकरण, यासारखी विविध ३१ विकासकामे मार्गी लावण्यात करंजाडे ग्रामपंचायतीला यश आले आहे. तर करंजाडेतील शिवमंदिर येथून पनवेल शहराला जोडणाऱ्या पुलाच्या कामासाठी पाठपुरावादेखील सुरू आहे.

## निवडक

### दोन अपघातांमध्ये दोघांचा मृत्यू

**पनवेल :** मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावर तसेच तळोजा येथे मागील १२ तासांत घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला आहे. यातील एका अपघातात पोकलेन ऑपरेटरचा डंपरच्या चाकाखाली येऊन मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्ग ओलांडणाऱ्या पादचाऱ्याचा कारच्या धडकेत मृत्यू झाला आहे. तळोजा येथे पहाटे झालेल्या अपघातात रणजितकुमार जिवाधन महतो (वय २६) या पोकलेन ऑपरेटरचा मृत्यू झाला. एका डंपरच्या चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. डंपर चालकाने त्याठिकाणावरुन पलायन केले असुन तळोजा पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर आदई गावाजवळ दुसऱ्या अपघातात रस्ता ओलांडताना कारची धडक बसून दत्ता वाघे (वय ४५) याचा मृत्यू झाला.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरला

**पनवेल :** तालुक्यातील आदई येथील दोन घराचा कडी-कोयंडा तोडून अज्ञात व्यक्तीने सोन्याची गंठण, बांगड्या आणि रोख रक्कम असा जवळपास दोन लाख किमतीचा ऐवज चोरून नेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. योगेश जाधव हे आदई येथे राहतात. ते घराला कुलूप लावून वळवली येथे गेले होते. या वेळी त्यांच्या घरात चोरट्याने प्रवेश करून छोटे मंगळसूत्र, झुमके, रोख रक्कम चोरून नेली.

### कार्यालयातून लॅपटॉपची चोरी

**पनवेल :** कार्यालयाचे कुलूप तोडून लॅपटॉपची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण जगनाडे यांचे विश्राळी नाका येथे ऑफिस आहे. घरी जाताना त्यांनी लॅपटॉप व इतर साहित्य ऑफिसमध्ये ठेवून दिले होते. या वेळी चोरांनी लॅपटॉप पळवून नेला.

### हातातील मोबाईल खेचून पलायन

**पनवेल :** भरधाव दुचाकीवरून आलेल्या लुटारूंनी पायी जाणाऱ्या तरुणाच्या हातातील मोबाईल खेचून पलायन केल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. खारघर पोलिसांनी या लुटारूविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. खारघर सेक्टर ३५मध्ये राहणारा निकेत खत्री (वय २७) हा मुंबईतील लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. तो भावाला भेटण्यासाठी तळोजा येथे गेला होता. त्यानंतर रात्री शेट पापा चौकातून पायी चालत जाताना, पाठीमागून स्कूटीवरून आलेल्या दोघा लुटारूंपैकी एकाने निकेतच्या हातातील मोबाईल खेचून खुटुकबांधणच्या दिशने पळ काढला. या वेळी निकेतने लुटारूंचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत लुटारू पळून गेले. या प्रकारानंतर निकेतने खारघर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.




पनवेल : कराडे खुर्द ग्रामपंचायतीच्या संकल्पनेतून महिला दिनानिमित्त हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी सरपंच भारती चितळे, उपसरपंच मिनल ठोंबरे, माजी उपसरपंच तथा सदस्य प्रमिला पाटील, सदस्य यशस्त्री मुरकुटे, माजी सरपंच विजय मुरकुटे, किरण माळी, योगेश मुरकुटे, योगेश पाटील आदी भाजप कार्यकर्ते, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.









# पद्मा खन्ना @ ७५

## (हुस्न के लाखों रंग...)

**झूम प्रहर**



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

पद्मा खन्ना पंचाहत्तर वर्षांची झाली (जन्म १० मार्च १९४९) असं मी म्हणेपर्यंत रसिकांच्या एका पिढीच्या डोळ्यांसमोर एव्हाना विजय आनंद दिग्दर्शित 'हुस्न के लाखों रंग' हे तिने जॉनी मेरा नाम (१९७०) या धमाकेदार मसालेदार मनोरंजक चित्रपटात पडद्यावर साकारलेले गाणे आले असेल. दारूमध्ये अखंड बुडालेल्या प्रेमनाथची वासनेने वखवखलेली नजर आणि त्याच्या मागणीनुसार पद्मा खन्नाने आपल्या अंगावरील एकेक वस्त्र उतरत केलेले मोहक मादक नृत्य हे त्या काळात चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि मीडियात विलक्षण गाजले. मुख्य प्रवाहातील चित्रपटात असं सनसनाटी नृत्य हाच एक मोठा सांस्कृतिक धक्का होता. (आज ओटीटीच्या युगात ते धक्के जणू नाहीसे झालेत) तेव्हा सेन्सॉरने कसं संमत केले यावर प्रसारमाध्यमांतून केवढे तरी ताशेरे ओढले गेले. अशातच पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत सुरू असतानाच ते चित्रपटातून चक्क काढले गेले म्हणून केवढा ओरडा. हे प्रकरण वेगळेच होते. नृत्य उत्तेजक आहेत अशी ओरड वाढल्याने सेन्सॉरने चक्क फेरतपासणीसाठी मागवून घेतले. चित्रपट सेन्सॉर करतानाच सेन्सॉर या गाण्यावर प्रक्षोभक असा शेरा मारला होताच आणि काही कट्सने ते सुटले होते, पण आता हे गाणे सेन्सॉरने पुन्हा पहायचे ठरवताच जॉनीचे निर्माते त्रिमूर्ती फिल्मचे गुलशन रॉय आणि देव आनंद लगोलग कोर्टात गेले आणि स्थगिती मिळवली. तात्पर्य आजही ते गाणे चित्रपटात कायम आहे. पद्मा खन्ना 'हॉट केक' म्हणून गॉसिप्स मॅगझिनमधून गाजत राहिली.

चित्रपटातील आपल्या प्रियकराला (रंधवा) खलनायकाने धमकावले आणि त्याच्या बॉडीगार्डसनी त्याला पकडून ठेवलंय अशा वेळी पद्मा खन्ना हे गीत नृत्य साकारतेय. चित्रपटाच्या जगात 'यश हेच चलनी नाणे' या नियमानुसार पिक्चर हिट आहेत, तर त्यातील लहान मोठ्या कलाकारांना त्याच स्वरूपातील भूमिका मिळत राहणे हा येथील पूर्वीचा अलिखित नियम. (आता परिस्थितीत बराच बदल झाला आहे तो फारच 'दिसतोय'.)

पद्मा खन्नाच्या नशिबी मग मोठ्याच प्रमाणावर अशाच भूमिका आल्या. खलनायकाची गर्लफ्रेंड, खलनायिका, व्हॅम्प अशा भूमिका तिने केल्या. तेव्हा तिची स्पर्धा प्रामुख्याने बिंदूशी होती. आशू, फरियालही अशा भूमिका करीत असे. रंगबिरंगी कॉन्टॅक्स लेन्स, भडक नि शॉर्ट्स कपडे, कधी एखादा मादक डान्स याच चाकोरीत या भूमिका अडकल्या. अधूनमधून एकादी कव्वाली वा मुजरा साकारायला मिळे.


अशा पद्मा खन्नाला पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त भरपूर शुभेच्छा. सध्या ती अमेरिकेत न्यू जर्सीमध्ये आपल्या नेहा व अक्षर या दोन वयात आलेल्या मुलांसोबत राहतेय आणि न्यूयॉर्क येथे तिने Indianica डान्स अकादमीचे स्थापना केली असून त्यात शास्त्रीय नृत्याचे शिक्षण देत आहे. हे तिच्या कारकिर्दीचे दुसरे टोक म्हणता येईल आणि हे चांगलेच आहे, कौतुकास्पद आहे. तिचा जन्म बिहारमधील पाटणा येथील एका सर्वसाधारण कुटुंबातील. वयाच्या सातव्या वर्षापासून ती कथक नृत्य शिकू लागली. मुंबईत येऊन बिरजू महाराज यांच्याकडूनही तिने नृत्याचे प्रशिक्षण घेतले. तेच तिचे वैशिष्ट्य ठरले. तेथेच वैजयंतीमाला, पद्मिनी यांचे तिच्या मेहनत व गुणवत्तेकडे लक्ष गेले आणि त्यांनी पद्मा खन्नाला चित्रपटातून अभिनय करण्याचा सल्ला दिला. हे सोपे काम नव्हतेच. सुरुवात तिने बिहारमध्येच निर्माण झालेला पहिला भोजपुरी चित्रपट गंगा मैया तोहे पियरी चढाईयो' (१९६२)मध्ये पद्मा खन्नाला भूमिका मिळाली. साठच्या दशकात काही भोजपुरी तर काही हिंदी चित्रपटातून भूमिका साकारण्यास सुरुवात केली. भोजपुरी चित्रपटात नायिका तर हिंदी चित्रपटात सहनायिका, छोटीशी भूमिका अशी ही वाटचाल होती. बिदेसिया, बालम परदेसीया, धरती मैया, भैया दूज, ये तुलसी मैया इत्यादी भोजपुरी चित्रपटातून तिने भूमिका साकारल्या. हिंदीत हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'बिवी और मकान' (१९६६)पासून सुरुवात केली. साज और सनम, परदे के पीछे, सीमा, जिंदगी अशा काही चित्रपटात भूमिका साकारत असतानाच तिला जॉनी मेरा नाम मिळाला. एका बाजूला पहावे तर मोठेच खणखणीत यश, दुसऱ्या बाजूला पहावे तर त्याच रंगढंगातील चौकटीतील भूमिका. एकदा का व्यावसायिक कलाकार म्हणून काम सुरू केले की पर्याय नसतो. एक चौकट ठरत जाते. चित्रपटासाठी नृत्य करताना त्यात शास्त्रीय नृत्यासाठीची संधी तशी क्वचितच आणि व्हॅम्प म्हटलं की क्लब डान्स, हॉटेल डान्स असा फंडा जास्त. त्यात उत्तेजक भावना ही थीमची गरज. व्यावसायिक कलाकार म्हणून हे करीतच वाटचाल करावी लागते.

अशातच पद्मा खन्नाला एक चांगली आणि लक्षवेधक भूमिका मिळाली. चित्रपट होता राजश्री प्रॉडक्सन्स निर्मित सौदागर (१९७३). सुधेन्द्रू रॉय दिग्दर्शित या चित्रपटात नूतन, अमिताभ बच्चन व पद्मा खन्ना यांच्या प्रमुख भूमिका. हा चित्रपट १९७२ साली सेटवर गेला तेव्हा अमिताभचा पडता काळच सुरू होता. 'बॉम्बे टू गोवा'च्या यशाचे श्रेय मेहमूद व किशोरकुमारकडे गेले. सेटवर प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३ साली प्रदर्शित), हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'अभिमान' (१९७३) व 'नमक हराम' (१९७३), नरेंद्र बेदी दिग्दर्शित 'बेनाम' (१९७४ साली प्रदर्शित) आणि सुधेन्द्रु रॉय दिग्दर्शित 'सौदागर' होते. यातील 'जंजीर' सुपर हिट होताना अमिताभ बच्चनला सूडनायक अर्थात अॅन्ग्री यंग मॅन अशी इमेज घट्ट चिटकली. 'सौदागर' त्याचा तसा नवप्रवाहाच्या पठडीतील चित्रपट. अशी गुळाचा पाक करून विक्री करीत सुखात जगत असलेल्या दाम्पत्यातील पती मोती (अमिताभ) नटखट, चुळबुळी फूलबानोच्या (पद्मा खन्ना) प्रेमात वेडापिसा होतो आणि त्यातच तो निर्णय घेतो आपली पत्नी महजबी (नूतन) हिला घटस्फोट देऊन फूलबानोशी लग्न करायचे. फूलबानोला चांगला गुळ कसा बनवायचा याचे ज्ञान नसते आणि त्यात तिला फारसा रसही नसतो. याचा फटका मोतीच्या व्यवसायाला बसतो आणि त्याची पुरती घसरण होते, फजिती होते. आता मोती फूलबानोला घटस्फोट देण्याचा निर्णय घेतो... अमिताभचा एक वेगळा चित्रपट म्हणून 'सौदागर' ओळखला जातो, पण चित्रपटाला रसिकांचा फारसा प्रतिसाद न मिळाल्याने पद्मा खन्नालाही आपली प्रतिमा बदलता आली नाही आणि मग तिच्या रुळलेल्या अशा खलनायिकेच्या भूमिकेत ती काम करीत राहिली. अशाने तिच्या चित्रपटांची संख्या वाढत राहिली इतकीच. दास्तान, रामपूर का लक्ष्मण, दाग, जोशीला, लोफर, जान ए वफा, कश्मकश, हेरा फेरी, पापी, अनुभव, घरसंसार वगैरे अनेक चित्रपटांमध्ये तिने भूमिका साकारली. तिची भूमिका असलेला यार मेरी जिंदगी हा चित्रपट १९७२ साली सेटवर गेला, पण बराच काळ रखडत रखडत २००८ साली पडद्यावर आला. विशेष उल्लेखनीय गोष्ट यात अमिताभ बच्चन व शत्रुघ्न सिन्हा यांच्या भूमिका असल्या तरी त्या फक्त आणि फक्त अगदी सुरुवातीला त्यांचे जेवढे शूटिंग झाले तेवढ्याच आहेत. खुद्द त्यांना तरी हा चित्रपट आठवत असेल का?

पद्मा खन्नाने पंजाबी (शेर पुत्तर), गुजराती, उडिया या भाषेतील चित्रपटांत भूमिका साकारल्या. तेलगूत तिने एनटीआरसोबत Desoddarakulu या चित्रपटात काम केले. मराठीतही कमलाकर तोरणे दिग्दर्शित देवता, हेम हिरा चित्र निर्मित माफीचा साक्षीदार या चित्रपटात तिची नृत्य पहायला मिळतात. 'देवता'मधील रवींद्र महाजनी व तिच्यावरचे खेळ कुणाला दैवाचा कळला हे गाणे सर्वकालीन लोकप्रिय आहे.










पद्मा खन्नाने छोट्या पडद्यावरही लक्षवेधक कामगिरी केली. रामानंद सागर यांच्या सागर आर्ट्स निर्मित रामायण मालिकेत कैकयी ही व्यक्तीरेखा साकारली. यातील कोपभवन दृश्याच्या चित्रीकरणात पद्मा खन्ना अशी व इतकी एकरूप झाली की तिच्या डोळ्यांत अश्रू आले आणि तिचे अश्रू पाहून रामानंद सागर यांनाही राहवले नाही. त्यांच्याही डोळ्यांत अश्रू आले. पहेचान, मीठा झहर या मालिकेतूनही तिने काम केले.

पद्मा खन्नाच्या काही विशेष गोष्टी सांगायलाच हव्या. आपल्या दीर्घकालीन अनुभवातून तिने चक्क चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले आणि २००४ साली 'नाहीर हुटील जवा' या भोजपुरी चित्रपटाचे दिग्दर्शन केले. सतत क्रियाशील रहावे हा तिचा बाणा त्यातून अधोरेखित होतो.


कमाल अमरोही दिग्दर्शित पाकिजा (१९७२) निर्मितीवस्थेत बरीच वर्ष असतानाच मीनाकुमारीची तब्येत बिघडली होती. तिला नृत्य करणे अवघड जात होते म्हणून चलो दिलदार चलो, तीर नजर देखेंगे या गाण्यात लॉन्ग शॉट्सना पद्मा खन्नाने नृत्य केलेय. नृत्य दिग्दर्शक व छायाचित्रणकार यांनाही याचे श्रेय. आजही 'पाकिजा'ची गाणी लोकप्रिय असून पुन्हा पुन्हा पाहिली जाताहेत.

आपली कारकीर्द छान चालली असतानाच पद्मा खन्नाने निर्माते जगदीश सदाना यांच्याशी १९८६ साली लग्न केले. सदाना निर्मित 'शेरदिल' या चित्रपटाच्या निमित्ताने त्यांची मुलाखत घेण्याचे त्या काळातील 'स्टार पीव्हीआरओ' बनी रुबैन यांनी मला सुचवल्यानुसार मी खार जिमखानाजवळील जगदीश सदाना यांच्या घरी गेलो. अतिशय प्रशस्त अशा इमारतीत पोहचलो आणि सदाना यांच्या घराची बेल वाजवली. काही मिनिटातच दरवाजा उघडला तो चक्क पद्मा खन्नाने. माझ्यासाठी हा आश्चर्याचा खूपच मोठा सुखद धक्का होता. सदानापेक्षा पद्मा खन्नाचीच मुलाखत घ्यावी असे वाटले. आम्ही तिघे एकत्र चहा पिता पिता काही गप्पा झाल्या. त्यात पद्मा खन्ना आपल्या एकूणच वाटचालीबद्दल पूर्ण समाधानी असल्याचे लक्षात आले. हे जास्त महत्त्वाचे.

सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटसृष्टीची अनेक वैशिष्ट्तांतील एक पद्मा खन्नाची कारकीर्द. काळ पुढे पुढे सरकत असतो आणि अनेक कलाकार मागील पिढीचे म्हणून ओळखले जातात. तरी त्यांची रूपेरी पडद्यावरील कामगिरी त्याचे वैशिष्ट्य व अस्तित्व पुढील पिढीतील रसिकांसमोर आणत असते, पद्मा खन्ना त्यातीलच एक.

# कवी मंगेश पाडगावकर

कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी वेंगुर्ले येथे झाला. मराठी आणि संस्कृत विषय घेऊन एमए झालेल्या पाडगावकर यांनी दोन वर्षे महाविद्यालयात अध्यापक म्हणूनही काम केले. १९५३ ते १९५५ ही दोन वर्षे पाडगावकर यांनी 'साधना' साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम केले. मुंबई आकाशवाणीवर १९६४ ते १९७० या कालावधीत निर्माता म्हणूनही त्यांनी काम केले. युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस–युसीस येथे मराठी विभागाचे प्रमुख संपादक म्हणून काही वर्षे काम केल्यानंतर १९८९मध्ये ते निवृत्त झाले.



६० आणि ७०च्या दशकात पाडगावकर, 'ज्ञानपीठ' विजेते कवी विंदा करंदीकर आणि कवी वसंत बापट यांचे एकत्रित काव्यवाचनाचे कार्यक्रम राज्यात अनेक ठिकाणी झाले. पाडगावकर यांनी लिहिलेली 'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे', 'भातुकलीच्या खेळामधली', 'शुक्रतारा मंद वारा' ही गाणीही खूप गाजली. प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं अगदी सेम असतं ही त्यांची कविताही विशेष गाजली होती.

दुबईमध्ये झालेल्या दुसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे पाडगावकर अध्यक्ष होते. उतारवयातही त्यांनी अनेक कार्यक्रमांमधून आपल्या कविता सादर करून रसिकांचे मन जिंकले. २०१३मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. २००८मध्ये त्यांना राज्यातील प्रतिष्ठेचा महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. १९८०मध्ये त्यांच्या सलाम या कविता संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. 'धारानृत्य' हा पाडगावकर यांचा पहिला काव्यसंग्रह १९५०मध्ये प्रकाशित झाला. सुरुवातीच्या काळात पाडगावकर यांच्या कवितेवर ज्येष्ठ कवीवर्य बा. भ. बोरकर यांचा ठसा होता. नंतर त्यांनी भावकाव्य शैलीत आणि स्वतंत्रपणे काव्यलेखन सुरू केले.

'जिप्सी' (१९५२), 'छोरी' (१९५४), 'उत्सव' (१९६२), 'विदुषक' (१९६६), 'सलाम' (१९७८), 'गझल' (१९८३), 'भटके पक्षी' (१९८४), 'बोलगाणी' (१९९०) हे पाडगावकर यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. पाडगावकर यांनी 'गझल', 'विदुषक', 'सलाम' या काव्यसंग्रहातून राजकीय आशयाची व उपरोधिकपणा असलेली समाजातील विसंगतीवर प्रहार करणारी कविता केली. सत्तेच्या संपर्कात राहणार्या वर्गातील लोकांनी सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रातील माणसांचा केलेला मानभंग, मध्यमवर्गीयांमध्ये आलेली लाचारी, दांभिकता याबद्दल पाडगावकर यांच्या मनात संताप होता तो या कवितांमधून प्रभावीपणे व्यक्त झाला. १९६०नंतरच्या वास्तवावर भेदकपणे प्रकाश टाकणारी पाडगावकर यांची कविता नवसमृद्ध वर्गाची, त्याच्या संवेदनाहीन मनाची चिरफाड करून वाचकांना अंतर्मुख करते. पाडगावकरांची कविता सादर करण्याची एक विशेष ढब होती. त्या ऐकताना श्रोते जसे खळखळून हसत तसेच मंत्रमुग्धही होत असत. शाळा कॉलेजांमधील पाठ्यपुस्तकांमध्येही पाडगावकरांच्या कविता होत्या.

'बोलगाणी' हा पाडगावकर यांनी काव्यरचनेवर केलेला एक वेगळा प्रयोग आहे. मीरा, कबीर आणि तुलसीदास यांच्या कवितांचे भावानुवादही पाडगावकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले होते. पाडगावकर यांचे 'भोलानाथ, 'बबलगम', 'चांदोमामा' हे बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत. १९६४मध्ये प्रकाशित झालेला 'वात्रटिका'हा त्यांचा कवितासंग्रह पाडगावकर यांची एक वेगळी ओळख करून देणारा ठरला आहे. पाडगावकर यांनी 'बायबल'ग्रंथाचा मराठी अनुवाद केला होता. अशा या थोर कवीचे ३० डिसेंबर २०१५ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज स्मृतिदिन. त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. शिवाय त्यांनी बाल विधवांना शिक्षण देणे, बालविवाह थांबवणे, सती प्रथेविरुद्ध लढा देणे आणि विधवांच्या पुनर्विवाहाला पाठिंबा देण्याचे काम केले. सावित्रीबाई यांनी केवळ समाजाचे शिक्षणच केले नाही, तर प्लेगसारख्या साथीच्या काळात लोकोपयोगी कार्य केले.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी ब्रिटिश भारतातील नायगाव (तेव्हा सातारा जिल्ह्यातील) येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील आणि आईचे नाव लक्ष्मीबाई होते. त्या काळी प्रचलित रितीरिवाजानुसार सावित्रीबाईंचा विवाह वयाच्या नवव्या वर्षी बारा वर्षांच्या ज्योतिराव फुले यांच्याशी १८४०मध्ये झाला. एकोणिसाव्या सावित्रीबाईंनी महिलांच्या शिक्षण आणि सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी पती ज्योतिराव फुले यांच्यासमवेत पुण्यातील भिडे वाड्यात प्राथमिक तरुण महिला शाळेची स्थापना केली. बाल विधवांना शिक्षित आणि मुक्त करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. बालविवाह आणि सती प्रथेविरुद्ध लढा दिला आणि विधवा पुनर्विवाहाला पाठिंबा दिला.

सावित्रीबाई फुले यांची महाराष्ट्रातील समाजसुधारक म्हणून ओळख आहे. इतकेच नव्हे तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या आदर्शांसह दलित मागणीचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. सामाजिक बदलाच्या प्रगतीत त्यांचा मोठा हात आहे. लग्नानंतर सावित्रीबाईंनी त्यांचे औपचारिक शिक्षण सुरू केले. पती ज्योतिराव फुले यांनी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले तसेच सर्व सेवाभावी प्रयत्नांमध्ये मनापासून साथ दिली.

ज्योतिराव आणि सावित्रीबाईंनी पुण्यात मुलींसाठी पहिली स्थानिक प्रशासित शाळा स्थापन केली. सावित्रीबाई कालांतराने शाळेच्या मुख्याध्यापिका झाल्या. नंतर ज्योतिराव आणि सावित्रीबाईंनी मांग आणि महार स्थानकांवरून अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू केल्या. १८५२मध्ये तीन सक्रिय फुले शाळा होत्या. ब्रिटिश सरकारने त्या वर्षी १६ नोव्हेंबर रोजी फुले कुटुंबाला शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या प्रयत्नांची दखल घेतली आणि सावित्रीबाईंची सर्वोच्च शिक्षिका म्हणून निवड झाली. त्यांनी त्याच वर्षी महिला सेवा मंडळ सुरू केले, ज्याचा उद्देश महिलांमध्ये त्यांचे हक्क आणि इतर सामाजिक समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे हे होते. विधवांच्या मुंडणाच्या प्रथेला विरोध करण्यासाठी मुंबई आणि पुण्यात न्हावी संप सुरू करण्यात त्या यशस्वी झाल्या.

सावित्रीबाईंनी कालांतराने १८ शाळा उघडल्या आणि विविध सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांना शिकवले. सावित्रीबाई आणि फातिमा शेख यांनी स्थानकातील महिला आणि लोकांना शिक्षण देणे सुरू केले. खूप लोक विशेषतः दलितांच्या विरोधात असलेला पुण्यातील उच्चवर्ग त्यात सहभागी झाले नाही. स्थानिक लोकांनी सावित्रीबाई आणि फातिमा शेख यांच्याशी तडजोड केली, ज्यांना सामाजिक आणि अपमानित केले गेले.

सावित्रीबाई शाळेत गेल्यावर त्यांच्यावर शेण, माती, दगड फेकले जायचे, पण त्या त्यांच्या ध्येयापासून दूर गेल्या नाहीत. दरम्यान, सावित्रीबाई आणि ज्योतिराव फुले यांनी १८५५मध्ये शेतकरी आणि मजुरांसाठी रात्रीची शाळा स्थापन केली, जेणेकरून ते दिवसा काम करू शकतील आणि रात्री त्यांच्या खोलीत आराम करू शकतील. मुलांच्या योग्य शिक्षणाबाबत पालकांना जागरूक करण्यासाठी त्यांनी पालक–शिक्षक सभांचे आयोजन केले, जेणेकरून ते मुलांना नियमितपणे शाळेत पाठवू शकतील.

१८६३मध्ये ज्योतिराव आणि सावित्रीबाई यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवांची हत्या थांबवण्यासाठी आणि बालमृत्यू थांबवण्यासाठी त्यांनी अनेक सभा घेतल्या. ज्योतिराव आणि सावित्रीबाईंना स्वतःचे मुल नव्हते, परंतु त्यांनी १८७४मध्ये काशीबाई नावाच्या विधवेकडून एक मूल दत्तक घेतले आणि सामान्य जनतेच्या सक्रिय सदस्यांना शक्तीचा एक महत्त्वाचा संदेश दिला. दत्तक मूल यशवंतराव पुढे तज्ज्ञ झाले.

ज्योतिरावांनी विधवा पुनर्विवाहाला चालना दिली, तर सावित्रीबाईंनी सती प्रथा आणि बालविवाह यासारख्या सामाजिक अन्यायांविरुद्ध अथक लढा दिला. त्यांनी तरुण विधवांना समान पायावर आणण्यासाठी शिक्षित, संलग्न आणि पुनर्विवाहाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. पूर्वीच्या माणसाचा कायमचा दर्जा आणि त्याच्याशी संबंधित चालीरीती काढून टाकण्यासाठी, खालच्या पदांवर असलेल्यांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी आणि हिंदूंच्या दैनंदिन जीवनात परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांनी आपल्या साथीदारांसोबत सहकार्य केले. अस्पृश्यांची सावली अपवित्र भासत असल्याने इतरांना पाणी द्यायला घाबरत असताना या जोडप्याने त्यांच्या घरी विहीर उघडली.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी ज्योतिरावांनी पुण्यात स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज या सामाजिक सुधारणा संस्थेशीही ते संबंधित होते. स्त्रिया, शूद्र, दलित आणि इतर गरजू लोकांचे अत्याचार आणि शोषणापासून संरक्षण करणे हे समाजाचे ध्येय होते. त्याच्या सदस्यांमध्ये विविध धर्मांचे लोक आणि सरकारी अधिकारी यांचा समावेश होता. २८ नोव्हेंबर १८९० रोजी पती ज्योतिराव फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सोसायटीच्या कार्यकारिणीची जबाबदारी स्वीकारली.

१८७६मध्ये सुरू झालेल्या दुष्काळात त्यांनी धैर्याने काम केले. त्यांनी विविध भागात मोफत अन्नदान केले. १८९७च्या मसुद्यात सावित्रीबाईंनी ब्रिटिश सरकारला मदतकार्य सुरू करण्यास पटवून दिले.

सावित्रीबाईंनी पुत्र यशवंतरावांना घेऊन आपल्या भागातील लोकांची तज्ज्ञ म्हणून सेवा केली. १८९७मध्ये जेव्हा बुबोनिक प्लेगच्या तिसऱ्या साथीने नालासोपारा आणि राज्याच्या आसपासचा परिसर गंभीरपणे प्रभावित केले तेव्हा सावित्रीबाई आणि यशवंतरावांनी या आजाराने पीडित रुग्णांवर उपचार करण्यासाठी पुण्याच्या काठावर एक केंद्र उघडले. त्यांनी रुग्णांना सुविधेकडे नेले, जिथे त्यांच्या मुलाने त्यांच्यावर उपचार केले. सर्व काही ठीक होण्याच्या नैसर्गिक प्रक्रियेत, रुग्णांची सेवा करीत असताना त्या आजारी पडल्या आणि १० मार्च १८९७ रोजी सावित्रीबाई फुले यांचे निधन झाले.

सावित्रीबाई फुले यांनी समाजातील प्रस्थापित वाईट गोष्टींना आळा घालण्यासाठी केलेले सततचे प्रयत्न आणि त्यांनी घडवून आणलेल्या चांगल्या बदलांची समृद्ध परंपरा आजही आपल्याला प्रेरणा देते. प्रदीर्घ कालावधीत त्यांचे सुधारणेचे प्रयत्न ओळखले जात आहेत. १९८३मध्ये पुणे सिटी कॉर्पोरेशनने त्यांच्या कामगिरीचा गौरव केला. १० मार्च १९९८ रोजी इंडिया पोस्टने त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट जारी केले. २०१५मध्ये पुणे विद्यापीठाचे नामकरण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे करण्यात आले. याशिवाय महाराष्ट्रातील महिला समाजसुधारकांना 'सावित्रीबाई फुले अनुदान' दिले जाते. (साभार : इंटरनेट)

## निवडक



### विरेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**खोपोली :** पेशवेकालीन दगडाच्या चिरापासून बनविलेला शंकर मंदिर असून खोपोलीसह खालापूर तालुक्यातील शिवभक्तांचे श्रध्दास्थान आहे. महाशिवरात्रीनिमित्त सकाळपासून भाविकांची अलोट गर्दी केली होती. शिवलिंगाची महापूजा, सायंकाळी श्री वीरेश्वर महाराजांची पालखी मिरवणूक श्री शंकर मंदिर ते खालची खोपोली या दिंडी सह टाळ-मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. श्री वीरेश्वर ग्रामस्थ मंडळ शंकर मंदिर वरची खोपोलीच्या पदाधिकाऱ्यांनी उत्तम व्यवस्था केली होती. पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### नांदले शाळेत बक्षीस वितरण



**मुरुड :** अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड माध्यमातून रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा नांदले येथे क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे बक्षीस वितरण आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत आगरदांडाचे सरपंच आशिष हेदुलकर, उपसरपंच संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्या कावेरी कांबळे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शीतल टकले, मुख्याध्यापक प्रमोद फुंदे, शिक्षक अभिजित रोहणे, अदानी फाउंडेशनचे जयश्री काळे, अवधुत पाटील उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय बक्षिस देऊन गौरविण्यात आले.

### रोहा ब्राह्मण मंडळातर्फे महाशिवरात्री

**रोहे :** ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे श्री ओंकारेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला



यानिमित्ताने दिवसभर मंदिरामध्ये भक्तगणांची गर्दी होती. पूजा व अभिषेक करण्यात आले त्यानंतर सकल रोहेकरांच्या स्वास्थ्यासाठी लघुरुद्र करण्यात आला. दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री ओंकारेश्वर मंदिरात येऊन महादेवांचे दर्शन घेतले. यामध्ये राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, समीर सकपाळ, समिधा सकपाळ, माजी नगरसेवक अमित उकडे आदींसह बहुसंख्य भक्तगणांनी उपस्थिती लावली.

### माटवण मोहल्ल्यामध्ये चोरी

**पोलादपूर :** तालुक्यातील माटवण मोहल्ल्यामध्ये शुक्रवारी रात्री बंद घरामध्ये चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून या घटनेमध्ये सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा दीड लाखांचा ऐवज लंपास झाला आहे. अम्मार इकबाल नाडकर यांच्या बंद घरात दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरफोडी झाली असून अल्मास नाडकर हे महाड येथे वास्तव्याला असतात तर त्यांची आई या घरामध्ये राहात असते, मात्र शुक्रवारी आई आजारी असल्याने ती रात्री जुन्या घरी झोपण्यासाठी गेली होती. यामुळे या घरामध्ये चोरी झाली. याप्रकरणी पोलीस तपास करीत आहे.


# रोह्यातील घेरासुरगड येथे आग | शेतकऱ्यांचे पेंढे, झाडे जळून खाक

## लाखोंचे नुकसान

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील खांब ग्रामपंचायत हद्दीत घेरासुरगड गावच्या परिसरात गेल्या तीन दिवसांपूर्वी आग लागली होती. या आगीमुळे गावातील दत्तात्रेय पांडुरंग पारठे, कृष्णा शेलार, चंद्रकांत पांडुरंग पारठे, एकनाथ गणपत पाशिलकर अशा चार शेतकऱ्यांच्या खासगी जागेत असलेले हजारो पेंडे, फळ झाडे, तयार कडधान्य आगीत जळून नष्ट झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले होते.





गावातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांने तलाठी, कृषी अधिकारी, संबंधित विभागांना आगीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती दिली होती, परंतु अद्याप पंचनामा कोणीच केलेला नाहीत. फक्त आज करतो, परवा करतो अशी उत्तरे दिली जातात अशी माहिती घेरासुरगड येथील शेतकरी चंदकांत पांडुरंग पारठे यांनी दिली. परिसरातील जवळपास पंधरा ते वीस एकरमध्ये आग लागली होती त्यापैकी आठ एकर जमीन ही मालकीची होती. शेतकऱ्यांची गुरे चरायला गेली होती.

कृष्णा शेलार मालकी जागेतील जायफळ दोन मोठी झाडे, सिताफळ एक मोठा, लिंबू एक, पेरु सहा झाडे, केळी आठ मोठ्या व ११ बारीक, फणस चार झाड, एक नारळ मोठी, आंब्यांची सहा झाडे, कडीपत्ता तीन, बांबु असे नुकसान झाले आहे तर एकनाथ गणपत पाशिलकर यांचे एक हजार पेंडे जळाले आहेत. चंद्रकांत पारठे व दत्तात्रेय पारठे या दोघा संख्या भावाचे ५००० ते ५५०० पेंडे, आठ आंब्यांची मोठी झाडे, सहा फणस, नारळ सहा मोठी व पाच लहान, मोठे काजु दोन, चिकु एक व एक बारीक, जांभुळ एक मोठी, कडीपत्ता दोन, बांबु, तयार तुरी, वाल असे कडधान्य जळुन खाक झालेले आहे. कृषी अधिकारी यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> **घेरासुरगड येथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील यांनी आगीबाबत माहिती फोन वरून मला दिली होती. झालेल्या नुकसानकीचा पंचनामा करून वरिष्ठांना सादर केला जाईल.**
> **-जामकर, कृषी अधिकारी, रोहा**

# पोलादपूरमधील तीन पुलांचे भूमिपूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील विविध विकासकामांचे ऑनलाईन पध्दतीने उद्घाटन आणि भुमिपूजन करण्याचा उपक्रम रायगड सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे नवी मुंबई येथील कोकण भवन येथे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि रायगडचे पालकमंत्रीउदय सामंत तसेच महिला बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्यासह विधानपरिषदेचेआमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रमुख ऑनलाईन उपस्थितीत करण्यात आले.



या वेळी बोरज फाट्यावर तीन पुलांचे भुमिपूजन भाजप तालुकाध्यक्ष तुकाराम केसरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यामध्ये भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मनोज भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत डेप्युटी इंजिनियर अमृत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या शासकीय विश्रामगृहाच्या प्रांगणात या कार्यक्रमाचे लाईव्ह आयोजन केले. या वेळी विश्रामगृहाचे भुमिपूजन आणि कोंढवी देवपूर रस्ता चोळई नदीवरील रस्त्यावरील पुलाचे बांधकामाचे उदघाटन करण्यात आले. यानंतर याचदिवशी बोरज देवळे हळदुळे रस्ता प्रजिमा १२५ वरील ढवळी नदीवरील मोठया पुलाचे बांधकाम करणे, कापडे पितळवाडी बोरघर कामथे रस्ता प्रतिमा १०१ च्या ५-१०० वरील मोठया पुलाचे बांधकाम करणे आणि कापडे पितळवाडी बोरघर कामथे रस्ता प्रतिमा १०१च्या ५-५०० वरील मोठ्या पुलाचे बांधकाम करणे या कामांचा भुमिपूजन सोहळा सावित्री नदी बोरज फाटा येथे करण्यात आला.

या कार्यक्रमाला शिवसेना तालुका संघटक व माजी राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, लक्ष्मण मोरे, गणेश गोळे, समीर सुतार, मंदार गोळे, परेश महाडीक, योगेश चव्हाण, मंगेश जंगम, अनिल दळवी, सुरेंद्र बांदल, नारायण साने, रामदास कळंबे, भाजप मंडल अध्यक्षा मंगल झाडाणे, देवळे सरपंच सुनिता सुतार, सा.बा. विभागाचे अभियंता तसेच बोरजचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोहोप येथे मोफत कर्करोग निदान शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने टाटा स्मारक केंद्र व बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड तर्फे लोहोप येथे मोफत कर्करोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या वेळी नागरिकांना कर्करोग आजारांवर तज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन करून तपासणी केली. या शिबिरात उपस्थित असलेल्या महिलावर्गाला प्लास्टिक बंदीवर जनजागृती करण्यात आली व कापडी बॅग वाटप करण्यात आले. या वेळी बिर्ला कार्बनचा स्टाफ, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

### शुद्धीपत्रक

दैनिक रामप्रहरच्या दिनांक ९ मार्च २०२४ रोजीच्या अंकात पान क्र. ५ वर **ग्रामपंचायत पालीदेवदच्या जाहिरातीमध्ये** ग्रामविकास अधिकाऱ्याचे नाव नजरचुकीने सुदिन धनाजी पाटील असे छापले गेले आहे.

तरी त्याऐवजी ते **श्री. एन. जी. केणी** हे नाव वाचावे.

# नेरळ पोलिसांकडून दोन जनावरांची सुटका; १५० किलो मांस जप्त

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाण्याला मिळालेल्या माहितीनुसार, गोवंशीय जनावरांची कत्तल केली जात असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार नेरळ पोलिसांनी तेथे धाड टाकली असता तब्बल गोवांशीय जनावरे यांचे १५० किलो मांस तसेच दोन लहान वयाची बैल आढळून आले. पोलिसांनी या कारवाईत दोघांना अटक केली असून, नेरळ पोलिसांकडून सातत्याने गोवंशीय तस्करी आणि हत्या रोखण्यासाठी धाडी टाकण्याचे सत्र सुरू ठेवले आहे.




दामत गावातील उमामा वसीम नजे आणि अब्दुल वसीम नजे यांच्या घरात आणि बेड्यामध्ये जनावरे तस्करी करून आणली आल्याची खबर नेरळ पोलिसांना मिळताच नेरळ पोलीस ठाण्याचे एक पथक हे दामत गावात पोहचले. या धाडीमध्ये उमामा नजे यांच्या घरामध्ये आणि बेड्यामध्ये दोन बैल कत्तलीसाठी आणून ठेवल्याचे, तर एका बाजूला गोवंशीय जनावरे यांचे तब्बल १५० किलो मांस आढळून आले. त्यावेळी त्या गोवंशीय मांसाचे वजन करीत असताना पोलिसांनी उमामा नजे आणि अब्दुल वसीम नजे या दोघांना ताब्यात घेतले. त्या ठिकाणी वजन काटा आणि जनावरे त्यांची कत्तल करण्यासाठी आणलेली लोखंडी खांडणी, तीन धारदार चाकू आणि लोखंडी सुरीदेखील ताब्यात घेण्यात आली. दरम्यान, सुटका झालेल्या दोन्ही बैलांची रवानगी कोंभळ वाडी येथील गोशाळेत केली आहे.

नेरळ पोलीस ठाण्यात दामत गावातील उमामा वसीम नजे आणि अब्दुल वसीम नजे या दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. सहायक पोलीस निरीक्षक आणि प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक श्रीरंग किसवे आणि अन्य पोलिसांनी ही कारवाई केली.


**पनवेल महानगरपालिका**
**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

निविदा सूचना क्र.पमपा/बांधकाम/६३२३/ प्र.क्र.३३/११८८/२०२४ — दिनांक : ०७/०३/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Centeral Government/ State Government/Government Undertaking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | PMC/CE/345/2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' प्र.क्र. ०१ कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे बांधकाम करणे. |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ११/०३/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका**



**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**फेब्रुवारी २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| ३० | किरण चाहू पोपेटा | चाहू चांगदेव पोपटा | पवल४-१८२३-२०२४ | १/२/२०२४ | गाळा क्र. १०६, पहिला मजला, घर क्र.७३, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३१ | किरण चाहू पोपेटा | चाहू चांगदेव पोपटा | पवल४-१८२७-२०२४ | १/२/२०२४ | गाळा क्र. १०७, पहिला मजला, घर क्र.७३, मौजे शिलोत्तर रायचूर |
| ३२ | किरण चाहू पोपेटा | चाहू चांगदेव पोपटा | पवल४-१८२२-२०२४ | १/२/२०२४ | गाळा क्र. ०७, पहिला मजला, घर क्र.७३, मौजे शिलोत्तर रायचूर |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन.जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**


# मोरे महिला महाविद्यालयात महिला दिनानिमित्त कार्यक्रम

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे महिला महाविद्यालयाच्या 'महिला विकास कक्षा'तर्फे शनिवारी (दि. ९) जागतिक महिला दिनानिमित्त रोहा तालुक्यातील माध्यामिक शाळांमध्ये महिला सक्षमीकरण या संकल्पनेवर आधारित पथनाट्य सादर केले.

महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी 'शोध अस्तित्वाचा' हे पथनाट्य रोहा तालुक्यातील 'विद्यानिकेतन माध्य शाळा, सानेगाव, यशवंतखार' आणि 'पीएनपी माध्य शाळा, तळाघर, वरसे' या दोन माध्यमिक शाळांमध्ये सादर केले. या द्वारे महिला सक्षमीकरणाबाबत विद्यार्थ्यामध्ये संदेश देऊन उपस्थितांची वाहवा मिळविली.

सानेगाव माध्य शाळेचे मुख्याध्यापक श्री गोरिवले आणि पीएनपी माध्य शाळेचे मुख्याध्यापक सागर शिंदे यांनी उपक्रमाला सहकार्य केले. मोरे महिला महाविद्यालयाच्या ३५ विद्यार्थिनींनी आयोजनात सहभाग घेतला. महिला विकास कक्षाच्या प्रा. दिपाली वारंगे, सहकारी प्रा. मयुरी लहाने आणि प्रा. योगिता नेहेते यांनी उपक्रमाचे नियोजन केले.

दरम्यान, एम बी मोरे महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात.



# वाढदिवसानिमित्त रोठ येथे आयुष्मान कार्ड उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपा रायगड लोकसभा प्रमुख सतिश धारप यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा तालुक्यातील रोठ येथे शुक्रवारी (दि. ८) रोजी राजमुद्रा फाउंडेशन यांच्या माध्यमातून आयुष्मान भारत कार्डचा उपक्रम राबविण्यात आले. या वेळी १५० नागरिकांना आयुष्मान विमा कार्ड काढण्यात आले.

या वेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष तथा राजमुद्रा फाऊंडेशनचे संस्थापक अमित घाग, रोशन चाफेकर दक्षिण रायगड जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस, विलास डाके, हाजी कोठारी, राजेश भगत, रिया कासार, सचिन मोरे, श्रद्धा घाग, निलिमा मोरे, निखिल बोरोले सदस्या वैभवी भगत, ग्रामपंचायत सदस्य मंगेश मोरे, आप्पा मोरे, सचिन मोरे, उमाजी मोरे, हेमंत मोरे यासह ग्रामस्थ व नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. दरम्यान, उपस्थितांनी सतिश धारप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.


**ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी**
मु.तांबाटी, पो. डोणवत, ता. खालापूर, जि. रायगड.

जावक.क्र. १९८ — दिनांक : ०९/०३/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड येथे ग्रामनिधी मधुन खालील प्रमाणे कामे करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीच्या अटी व शर्ती अधिन राहुन मोहरबंद कोटेशन निविदा मागविण्यात आल्या आहेत. खाडोखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामाच्या पुर्ण भरलेल्या निविदा दि. १०/०३/२०२४ ते दि. १६/०३/२०२४ अखेरपर्यंत सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते रोजी सायं. ५ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात जमा कराव्यात. प्राप्त निविदा ग्रामपंचायत कार्यालयात हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष दिनांक १८/०३/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. उघडण्यात येतील. या कामासाठी आलेल्या निविदापैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा आलेल्या सर्व कोटेशन निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निधी | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत कार्यालयासाठी laptop खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | १ महीने |
| २ | ग्रामपंचायत कार्यालात सुरक्षित (RO) पाण्याची सुविधा करणे | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | १ महीने |
| ३ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यामध्ये हेल्दी बेबी शो आयोजित करणे | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | १ महीने |

**अटी व शर्ती :-**
१) साहीत्य ग्रामपंचायतीच्या अटी व शर्तीनुसार पुरवठा करावयाचे आहे. २) कोटेशन बंद लखोट्यात असावे.
३) नोंदनीकृत ठेकेदारांना व जी.एस.टी. धारक ठेकेदारांना प्राधान्य देण्यात येईल ४) पोस्टाने निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
५) अटी व शर्ती घालून सादर केलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. ६) पुरेसी स्पर्धा न झाल्यास प्रक्रीया रद्द करुन फेर प्रक्रीया करण्यात येईल. ७) निविदा मंजूर करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत कमिटीने राखून ठेवला आहे.
८) सदर कामाचे खरेदी करण्यासंदर्भात साहित्य व त्याचा तपशील ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध असून त्यानुसार कोटेशन भरण्यात यावे
९) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १८/०३/२०२४ रोजी निविदा सादर करणाऱ्यांचे अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचेसमोर दुपारी १२.०० वाजता उघडणेत येतील.
कोणतीही एक निविदा स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी कमिटीने राखून ठेवला आहे.

ठिकाण:- ग्रा. प. तांबाटी

**(सही)**
**ग्रामसेवक**
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी

**(सही)**
**सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी

# नवी मुंबईत 'एआय'मार्फत प्राध्यापकाला एक लाखाचा गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत 'एआय'चा वापर करून एका व्यक्तीकडून एक लाख रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. फसवणूक झालेली व्यक्ती ही सायन येथील एका कॉलेजमध्ये प्राध्यापक आहे. कॉलेजमध्ये असताना त्यांना एका आंतरराष्ट्रीय नंबरवरून व्हॉट्सअॅप कॉल आला. समोरून बोलणाऱ्या व्यक्तीने आपण 'सीबीआय'मधून बोलत असल्याचे सांगत ही फसवणूक केली.




व्हॉट्सअॅप कॉलमधून सांगण्यात आले की, नवी मुंबईच्या सीवूडमध्ये घडलेल्या प्रकरणी तुमच्या मुलाला बलात्काराच्या गुन्हात पकडले असून त्याच्यावरील अटकेची कारवाई टाळण्यासाठी एक लाख रुपयांची द्या. त्यानंतर कॉल करणाऱ्याने या प्राध्यापकाला कोणतीही हालचाल करू न देता तत्काळ निर्णय घेण्यास भाग पाडले. खात्री पटावी म्हणून आरोपीने प्राध्यापकाचे मुलासोबतही बोलणे करून दिले. मुलाचे बोलणे ऐकून घाबरलेल्या वडिलांनी आरोपीच्या सांगण्यावरून विविध खात्यांमध्ये तब्बल एक लाख रुपये जमा केले. त्यानंतर या प्राध्यापकाने पुन्हा मुलाला फोन लावला असता तो घरीच असल्याचे कळले. त्यानंतर वडिलांनी मुलाला हा सगळा प्रकार सांगितल्यानंतर ही फसवणूक असल्याचे समोर आले. त्यांनी सायबर पोलिसांकडे फिर्याद दिली आहे.

संबंधित मुलाचा आवाज वडिलांना ऐकवण्यासाठी अगोदर बाप-लेकाचे फोनवरील बोलणे रेकॉर्ड करण्यात आले होते का, असे आवाज रेकॉर्ड करण्यासाठी मोबाईल अॅप्लिकेशनचा वापर केला गेला का याचा आता शोध घेतला जात आहे. एआयचा वापर करून मुलाचा आवाज मॅच करून ही फसवणूक या भामट्याने केल्याचे उघड झाल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला.





**खारघर : राईट चॉईस गारमेंट्स या भव्य दुकानाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्यांनी राईट चॉईसचे मालक जी.एन. गुप्ता यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, प्रभाग अध्यक्ष लखविंदर सैनी, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा अध्यक्ष संतोष शर्मा, विनोद ठाकूर विपुल चोटलिया, शैलेन्द्र त्रिपाठी, संदीप रेड्डी, दीपक ठाकूर, मधुसूदन आचारी, आदेश भोईर, अखिलेश मिश्रा, विजय बागडे आदी उपस्थित होते.**



# कळंबोलीत ठाकरे गटाला खिंडार

## उपशहरप्रमुखासह कार्यकर्ते शिवसेनेत

**पनवेल : वार्ताहर**

ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर कळंबोली येथील उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख सचिन मोरे आणि महेंद्र पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यांच्याबरोबर अविनाश केसकर, निलेश घुले आणि इतर शिवसैनिकांनी शिंदेंचा झेंडा हातात घेतला. रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, खासदार श्रीरंग बारणे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी त्यांचे स्वागत केले.

भारतीय जनता पक्ष या मतदारसंघांमध्ये मजबूत आहेच. त्याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेसुद्धा गेल्या वर्ष दीड वर्षांमध्ये आपली पाळेमुळे रुजवली आहेत.

पक्षांमध्ये इन्कमिंग सुरूच असून कळंबोलीमध्ये जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेला धक्का दिला आहे. या पक्षाचे कळंबोली उपशहर प्रमुख सचिन मोरे, आणि महेंद्र पवार यांनी गुरुवारी शिवसेनेमध्ये प्रवेश केला.

शिवसेनेचे पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महानगर संघटक मंगेश रानवडे, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, संजय शेडगे, महेश गोडसे, निलेश डिसले यांच्यासह पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

या वेळी प्रवेश केलेल्या सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांना आपल्या पक्षामध्ये सन्मान केला जाईल. त्यांना जबाबदाऱ्यासुद्धा दिल्या जातील, अशी ग्वाही पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.

# मोबाईलच्या दुकानात चोरी

**पनवेल** : मोबाईल दुकानाच्या गल्ल्यातील साडेतेरा हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याप्रकरणी प्रथम जाधव आणि साहिल धोत्रे यांच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

महेश देसाई हे भावना मोबाईल शॉप, साईबाबा मंदिराजवळ, पनवेल रेल्वे स्टेशन रोड या ठिकाणी काम करतात. ते ग्राहकांना मोबाईल दाखवण्याचे काम करीत असताना प्रथम जाधव व साहिल धोत्रे यांनी मोबाईलमधील त्यांचा फोटो दाखवून हा तुझाच फोटो आहे का, अशी विचारणा केली. त्यांनी माझा फोटो आहे, असे सांगितले असता साहिल यांनी शिवीगाळ व दमदाटी केली आणि खुर्ची उचलून डोक्यावर, हातावर मारहाण केली. जोराने लाथ मारून दुकानाच्या गल्ल्यातून साडेतेरा हजार रुपये जबरदस्तीने काढून ते घेऊन गेले, याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.



**खारघर : महाशिवरात्रीनिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूकप्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्रीशिव मंदिर ट्रस्ट येथे भेट देऊन भगवान शिवशंकरांचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करीत महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, वासुदेव पाटील आदी उपस्थित होते. दरम्यान, रमेश गांधी व लेवा पाटीदार समाज यांच्यामार्फत सालाबादप्रमाणे शिवमंदिरात खिचडी वाटप करण्यात आले.**

# सीकेटी महाविद्यालयात जागतिक महिला दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने बुधवारी (दि. ७) जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

याकार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी केले. यावेळी त्यांनी महिला हक्क चळवळीची पार्श्वभूमी सांगूनजागतिक महिला दिनाचा उदय व त्याचे महत्व सांगितले तसेच या कार्यक्रमात ५६ प्राध्यापिका व शिक्षकेत्तर महिलांनी सहभाग घेतला.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले, तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीतील महिला वर्गाचे योगदान अधोरेखित करून त्यांच्या कार्याचा गौरव केला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सोनाली हुद्दार, प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन महिला विकास कक्षाच्या माजी अध्यक्षा डॉ. स्मिता भोईर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवश्री गाडगीळ यांनी केले.

या कार्यक्रमाचेयशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, आय.क्यू.ए.सी.समन्वयक प्रो.डॉ.बी.डी.आघाव, रुसा समन्वयक डॉ.एस.एन.वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने याकार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

# महिला पत्रकारांचा नवी मुंबईत सन्मान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई जर्नालिस्ट वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील पत्रकार कक्षामध्ये महिला पत्रकारांचा सन्मान करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये विविध वृत्तपत्रांच्या आणि वृत्तवाहिनींच्या महिला पत्रकार मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, विधीतज्ज्ञ अॅड. वंदना दळवी, पोलीस अधिकारी शुभांगी पाटील, अभिनेत्री श्रेजा म्हात्रे, गोल्ड मेडल विजेत्या कुस्तीपटू राजश्री बांगर आदींनीही महिला पत्रकारांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जर्नालिस्ट वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अशोक शेशवरे, प्रमुख सल्लागार विश्वरथ नायर, सचिव नागमणी पाण्डे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिलकुमार उबाळे यांनी केले.

# अटल सेतू : तिसऱ्या मुंबईकडे वाटचाल

**मुंबईला भारताच्या मुख्य भूभागाशी जोडणारे अंतर कमी करणारा आणि प्रवासाच्या वेळेत बचत करणारा अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू १२ जानेवारीपासून खुला झाला. मुंबईसह परिसराची सर्वांगीण उन्नती साधणारा, प्रवाशांच्या सुरक्षेची काळजी घेणारा आणि मुंबई शहराच्या चौफेर विस्तारासाठी सहाय्यभूत ठरणारा हा सेतू विकासाची गॅरंटी दर्शवत आहे. दै. रामप्रहरच्या वाचकांसाठी या अटल सेतूबाबतची सविस्तर माहिती देणारी लेखांची मालिका.**

**विकासाची गॅरंटी**

मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) अर्थात अटल सेतूच्या आसपास 'तिसरी मुंबई' विकसित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासंबंधी राज्य सरकारच्या नगर विकास खात्याने नुकत्याच दोन अधिसूचना काढल्या आहेत. नगरविकास खात्याने काढलेल्या पहिल्या अधिसूचनेनुसार अटल सेतुच्या आजूबाजूची गावे मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) अंतर्गत असणाऱ्या 'न्यू टाऊन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी'ला विकसित करण्यासाठी हस्तांतरित करण्यात येणार आहे. सुमारे ३२३.४४ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात वसलेल्या १२४ गावांच्या



विकासासाठी एनटीडीएला नियुक्ती करण्याची विनंती एमएमआरडीएने २८ ऑगस्ट २०२३ रोजी राज्य सरकारला केली होती. त्यानुसार ही अधिसूचना काढण्यात आलेली आहे. यामध्ये नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील ८० गावे, खोपटा न्यू टाऊन अधिसूचित क्षेत्रातील ३३ गावे, मुंबई मेट्रोपोलिटन रिजनल प्लॅनमधील दोन गावे आणि रायगड प्रादेशिक आराखड्यातील नऊ गावांचा समावेश आहे.

खोपटा व पेणचा बराचसा भाग पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कोस्टल झोन रेग्युलेशन अंतर्गत येत असल्याने जमिनीच्या विकास क्षमतेवर मर्यादा येतात. त्यामुळे नाव हटविल्यामुळे सिडकोला कोणतीही अडचण नसल्याचे सिडकोच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. सिडको अंतर्गत येणाऱ्या 'नैना' अंतर्गत नवीन शहर विकसित करण्यासाठी बऱ्याच काळापासून प्रयत्नशील आहोत, परंतु आता एमएमआरडीएच्या नेतृत्वाखालील एनटीडीएद्वारे अधिक वेगाने नव्या शहराचा विकास होईल असे सरकारला वाटते, असे या अधिकाऱ्याने सांगितले.

सरकारने काढलेल्या दुसऱ्या अधिसूचनेत नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील ८० गावे आणि खोपटा न्यू टाऊन अधिसूचित क्षेत्रातील ३३ गावांच्या विकासासाठी 'विशेष प्राधिकरण' म्हणून शहर व औद्योगिक विकास महामंडळाची (सिडको) सरकारने केलेली नियुक्ती अधिसूचनेद्वारे मागे घेण्यात आली आहे. दुसऱ्या अधिसूचनेत सिडकोचे नाव हटवून एमएमआरडीएच्या नेतृत्वाखालील एनटीडीएची तिसऱ्या मुंबईचे नियोजक प्राधिकरण म्हणून नेमणूक करण्याबाबत हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. शिवडी ते चिर्ले जोडणाऱ्या अटळ सेतूमुळे या प्रदेशाच्या आर्थिक विकासावर आणि वाढीवर मोठा सकारात्मक परिणाम होईल आणि एमटीएचएल प्रकल्प आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होईल, अशी अपेक्षा आहे.

पुष्पक नगर सेक्टर ६मध्ये प्लॉट नंबर ४६मध्ये असलेल्या 'व्हॅलीएनट' प्रोजेक्टचे संचालक आदित्य मयूर म्हणतात की, अटल सेतूमुळे मुंबईचे अंतर कमी झाले. कमीत कमी वेळात मुंबईला पोहचता येते. त्यामुळे मुंबईच्या गर्दीपासून दूर निसर्गाच्या सानिध्यात पुष्पक नगरमध्ये असलेले लक्झरी फ्लॅट घेण्याकडे उच्च वर्गीयांचा कल दिसत आहे. तर रस्त्याच्या पश्चिमेला रेल्वे लाईनच्या पलीकडे विमानतळाच्या बाजूला मध्यमवर्गीय राहण्यासाठी फ्लॅटला पसंती देताना दिसत आहेत. पुष्पक नगरच्या पूर्वेला फाईव्ह स्टार हॉटेल, उद्यान, शाळा, स्पेशालिटी हॉस्पिटल व क्रिडांगण याची कामे सुरू आहेत. त्यामुळे येथील दर वाढलेले दिसतात. याशिवाय पनवेल, करंजाडेपासून पळस्पे फाटापर्यंत जागेला चांगला भाव आला आहे.

पनवेलमधील अनेक वकिल उच्च न्यायालयात काम करीत आहेत. त्यांना अनेक वेळा पनवेल जिल्हा न्यायालयातून मुंबईला उच्च न्यायालयात जावे लागते. यापूर्वी त्यांना प्रवासाला जास्त वेळ लागत होता. त्यामुळे अनेक वेळा पक्षकार नाराज होत असत. अटल सेतूमुळे ते एका तासात उच्च न्यायालयात पोहचतात. त्यामुळे आता वकिलांवर ती वेळ येणार नाही, असे पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांनी सांगितले. **(समाप्त)**

**-नितीन देशमुख**

# योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**पनवेल** : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नुकतीच पीएम सूर्यघर बिजली योजना जाहीर केली आहे. छतावर सौरऊर्जा उभारणीद्वारे घरांना मोफत वीज उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

दरमहा ३०० यूनिटपर्यंत मोफत वीज देऊन एक कोटी कुटुंबांना प्रकाश देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. वीज निर्मितीसाठी रुफटॉप सोलरपॅनल बसविण्यास येणार आहे. पात्र कुटुंबांना मोफत वीज मिळेल, तसेच भरीव सबसीडी थेट लोकांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जाईल. सर्व भागदारकांना सोईसाठी राष्ट्रीय ऑनलाईन पोर्टलमध्ये एकत्रित केले जाईल.

घरांच्या छतावर सोलरपैनल बसवण्यासाठी सोलरपॅनलच्या खर्चाच्या ४० टक्क्यांपर्यंत (७८०००) अनुदान दिले जाईल. पीएम सूर्यघर मोफत बिजली घर योजनेत सहभागी होण्यासाठी आणि नाव नोंदणी करण्यासाठी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**कामोठे : येथील शिवमंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी विजय चिपळेकर, विकास घरत, रवींद्र जोशी राजेश गायकर, किशोर गोवारी, महेंद्र गोवारी, पंडित पावणेकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वर्गमित्र आणि ज्येष्ठ भाजप कार्यकर्ते बी. टी. कांबळे गुरुजी यांचा ७६वा वाढदिवस साजरा झाला. या वेळी अनंताशेठ ठाकूर, अंकुश ठाकूर, आर. सी. घरत, सुधीर ठाकूर, संदीप म्हात्रे, सुहास भगत, गजानन घरत, आशिष घरत आदी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# टेम्पोची कंटेनरला धडक; चालक जखमी

**पनवेल** : जेएनपीटी हायवेकडे जाणाऱ्या रोडवर कॉलेज फाटा पनवेलजवळ टेम्पो आणि कंटेनरमध्ये सकाळच्या सुमारास अपघात झाला आहे. यात टेम्पोतील चालक जखमी झाला आहे.

पाण्याचे जार घेऊन जाणारा टेम्पो चालक जेएनपीटी हायवेकडे जाणाऱ्या रोडवर पनवेलच्या दिशेने जात होता. टेम्पो कॉलेज फाट्याजवळ आला असता चालक पतीराम सरोज याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो उरणकडे जाणाऱ्या विरुद्ध लेनवर येत कंटेनरला धडकला. या धडकेत टेम्पोचे नुकसान झाले असून चालक जखमी झाला आहे.

अपघातात कंटेनरचेदेखील नुकसान झाले आहे. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस आणि पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

# मुरूड परिसरात वणव्यांचे सत्र

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराजवळील दत्तमंदिर व राजवाडा पंचक्रोशी भागातील विहुर, आदाड जंगलातील भागात वणवा लागून मोठ्या प्रमाणावर आग पसरल्याने लाखो मोलाची वनसंपदा भस्मसात झाली आहे. हल्ली सर्रास वणवे लागत आहेत. वनविभागाने याची गंभीर दखल घेऊन पावले उचलण्याची मागणी होत आहे.

मुरूड तालुक्यात वणव्यांचे सत्र सुरू आहे. गेल्या महिन्यात राजपुरी डोंगरावर, एकदरा गावातील डोंगरावर वणवे लागले होते. याकडे दुर्लक्ष झाल्याने मुरुड शहरासह पंचक्रोशीत वणवेच वणवे दिसू लागले आहे.



वणवे सारखे सारखे लागत आहेत या संदर्भात वनपरिक्षेत्र कार्यालयात विचारणा केली असता त्या ठिकाणी कोणीही या विषयाला गांभीर्याने घेतले नाही. शेवटी फणसाड अभयारण्याचे अधिकारी तुषार काळभोर यांना विचारले असता ते म्हणाले की, मालकी जागेत रितसर परवानगी घेऊन आग लावली आहे.

वणवे मालकी जागेत लावत असताना इतर क्षेत्र जळीत झाले आहे याला जबाबदार कोण, असा सवाल व्यक्त होत आहे. वणव्यांमुळे वृक्षसंपत्ती आणि तृणभक्षी वन्यजीव नष्ट होण्याच्या मार्गावर दिसत आहेत. परिणामी पर्यावरणातील संतुलन बिघडण्यासाठी हे वणवे कारणीभूत ठरत आहेत.

मुरूड तालुक्याला निसर्गाने पर्वत, नद्या, जंगले, वन्यपशू, पक्षी, तलाव, झरे, दऱ्या इत्यादी वरदान स्वरूपात दिले आहे. यामुळे पर्यावरणाचे संतुलन टिकून आहे. ही नैसर्गिक संपत्ती योग्य प्रकारे संरक्षित केली पाहिजे. याकरिता वन विभागाने वणवे विझवण्यासाठी तत्पर सुविधा निर्माण करावी व स्थानिक जनतेस दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# कुटुंबातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्यासाठी पाठिंबा द्या

## अधिकारी निर्मला कुचिक यांचे आवाहन



**अलिबाग : प्रतिनिधी**

महिलांना घरची लक्ष्मी म्हणून तिला घरात बसणे योग्य नाही, तिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले पाहिजे. त्यासाठी पाठिंबा दिला पाहिजे. महिला सर्वच क्षेत्रात चांगले काम करतायत, गरज आहे ती महिलांना समाजात व्यक्ती म्हणून समान स्थान देण्याची, असे मत रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी व्यक्त केले.

### तेजस्विनी पुरस्कारांचे वितरण

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येला अलिबाग प्रेस असोसिएशनतर्फे आयोजित तेजस्विनी पुरस्कार वितरण सोहळ्यात कुचिक प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. आदर्श भुवन येथे झालेल्या या समारंभास रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, अलिबाग तहसिलदार विक्रम पाटील, आदर्श पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर उपस्थित होते.

ज्येष्ठ चित्रकार चंद्रकला कदम, जीवाची पर्वा न करता दोन अपहरणकर्त्यांना पकडणाऱ्या पोलीस हवालदार सुवर्णा खाड्ये, प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत एमपीएससी उत्तीर्ण होणाऱ्या सोनाली तेटगुरे आणि धनुर्विद्या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय पातळीवर पोहचलेल्या तनिषा वर्तक यांना तेजस्विनी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महिला या उत्तम व्यवस्थापक असतात. काहीवेळा आपले कर्तव्य बजावत असतान बरेचदा माहिला आपल स्वत्व हरवून बसतात. तसे न करता महिलांनी वेगवेगळ्या पातळ्यांवर काम करून आपले स्वत्व जपावे, असे मत जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांनी व्यक्त केले.

महिला सर्वच क्षेत्रांत चांगले काम करीत आहे. त्यांना समाजाकडून केवळ प्रोत्साहनाची गरज असल्याचे तहसीलदार विक्रम पाटील म्हणाले.

रायगड जिल्ह्यातील तरुण मुलींनी स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करायला हवी. त्यातून भविष्यात प्रशासकीय अधिकारी महिला जिल्ह्याला मिळू शकतील, असे मते आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.

अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन महेश पोरे यांनी केले, तर आभार संस्थेचे सचिव राजेश भोस्तेकर यांनी मानले. या वेळी अलिबागमधील विविध क्षेत्रांत काम करणारे मान्यवर उपस्थित होते.

# नागोठणे येथील आरोग्य शिबिरास महिलांचा प्रतिसाद

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नागोठणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील सभागृहात शुक्रवारी (दि.८) मोफत वैद्यकीय मार्गदर्शन, तपासणी आणि औषधवाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास महिलांचा चांगला प्रतिसाद लाभला.



या शिबिरावेळी रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र धात्रक, रायगड मेडिकल असोसिएशनचे भावी अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, डॉ. शीतल जोशी घुगे (एमडी पॅथॉलॉजी), डॉ. राजश्री बडगिरे (गोल्ड मेडलिस्ट), डॉ.सलील पाटकर (कॅन्सरतज्ज्ञ), डॉ. दशरथ घुगे, डॉ. कांचन कदम, ता. मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. सुनील पाटील, ज्येष्ठ डॉ. जी.एस. कोकणे, डॉ. रोहिदास शेळके, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते भाईसाहेब टके, सरपंच सुप्रिया महाडिक, पाटणसई सरपंच माधवी गायकर, पं.स.चे माजी सभापती सदानंद गायकर, माजी सरपंच विलास चौलकर, राष्ट्रवादी विभाग अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, सुधाकर जवके, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, पळस माजी सरपंच किसन बोरकर, माजी जि.प. सदस्य सखुबाई पिंगळा, दीपाली टके, रिचा धात्रक, सुजाता जवके, पुनम काळे, अमृता महाडिक, भाविका गिजे, ज्योती राऊत, रेखा टेमकर, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आदित्य सिरसाट, रोहा तालुका मेडिकल असोसिएशनचे सेक्रेटरी संकेत म्हात्रे, खजिनदार चिन्मय ओक, डॉ. अभिषेक शहासने, डॉ. नरेश सोष्टे, डॉ. पुरषोत्तम भोईर, डॉ. संदेश शिंदे आदी उपस्थित होते.

महिलावर्गाचे समाजात फार मोठे योगदान असून पुरुषांमागे महिला सशक्तपणे उभ्या असतात. धावपळीच्या जीवनात महिला सशक्त व निरोगी असणे काळाची गरज असल्याचे डॉ. राजेंद्र धात्रक म्हणाले. दरम्यान, आरोग्य शिबिराचा २०० महिलांनी लाभ घेतला. या शिबिरास ट्रू डायग्नोस्टिक लॅबचे सहकार्य लाभले.

# डॉ. सादिका नवाब आणि वामन दिघे यांना कै. र.वा.दिघे साहित्य पुरस्कार जाहीर

**खोपोली : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या खोपोली शाखेतर्फे दिला जाणारा कै.र.वा.दिघे साहित्य पुरस्कार या वर्षी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या साहित्यिक डॉ. सादिका नवाब (सहर) आणि वामन रघुनाथ दिघे यांना जाहीर झाला आहे. संस्थेच्या अध्यक्ष उज्ज्वला दिघे यांनी ही घोषणा केली.

सादिका नवाब (सहर) यांच्या 'राजदेव की अमराई' या उर्दू कादंबरीस यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे तसेच वामनराव दिघे यांनी थोर साहित्यिक कै. र.वा. दिघे यांची साहित्यिक वाटचाल, चरित्र 'साहित्य शिल्प' या पुस्तकाद्वारे लोकांसमोर मांडली. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

दरवर्षी कै. र.वा. दिघे यांच्या जयंती दिनी हा पुरस्कार देण्यात येतो. नवोदित लेखकांना प्रेरणा देणे तसेच साहित्यिकांना लिखाणासाठी प्रोत्साहित करणे हा या पुरस्कारामागील उद्देश असल्याचे उज्ज्वला दिघे यांनी सांगितले.

# डोंगरीसुभा येथील स्मशानभूमी रस्त्याचे नूतनीकरण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील डोंगरीसुभा येथील स्मशानभूमी रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम आमदार महेंद्र दळवी यांच्या निधीतून करण्यात येत आहे. नुकतेच त्याचे भूमिपूजन शिवसेना मुरूड तालुकाप्रमुख ऋषिकांत डोंगरीकर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, मुरूड भंडारी बोर्डिंग अध्यक्ष श्रीकांत सुर्वे, महेश पाटील आदी उपस्थित होते. डोंगरीसुभा स्मशानभूमी रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. आमदार महेंद्र दळवी यांना या रस्ताची दुरूस्ती व नूतनीकरण करून देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार काम सुरू झाले आहे.



या वेळी डोंगरीसुभा अध्यक्ष मच्छिंद्र नाईक, उपाध्यक्ष मंगेश पुलेकर, संजय भोसले, रवींद्र नाईक आदी पंचमंडळी उपस्थित होती तसेच जय कालिकामाता महिला मंडळाच्या अध्यक्ष मानसी मंगेश भोसले, उपाध्यक्ष मानसी नाईक, प्रतिक्षा भोसले आदी महिला उपस्थित होत्या.

# कोर्लईच्या रताळ्यांची विक्रमी विक्री

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील मुख्य बाजारपेठेत महाशिवरात्री उपवासाठी कोर्लईची रताळी दोन दिवस अगोदरच बाजारात दाखल झाली होती. या रताळ्यांची विक्रमी विक्री होऊन लाखो रुपयांचा व्यवसाय झाल्याने स्थानिक विक्रेते सुखावले आहेत.

रताळी घेण्यासाठी शहरातील व पंचक्रोशी भागातील नागरिकांनी गर्दी केली होती. यंदा रताळ्यांचा भाव ३० टक्क्यांनी वाढला आहे. तरीसुद्धा ग्राहकांनी मोठा प्रतिसाद देऊन रताळी खरेदी केली आहे. महाशिवरात्रीचा उपवास म्हणून महत्त्व असते.त्यामुळे मोठ्या संख्येने लोकांनी रताळी खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती. हजारो टन आणलेली रताळी दिवसांत संपून स्थानिक शेतकऱ्यांना चांगला व्यवसाय होऊन फायदा मिळाला आहे.

तालुक्यातील कोर्लई या ठिकाणी रताळे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. ही रताळी गोड, चविष्ट व पौष्टिक असून त्यांना भरपूर मागणी असते. यामध्ये छोटी रताळी ६० रुपये किलो, तर मोठी व चांगली रताळी १०० किलो दराने विकली गेली. रताळी विक्रीत लाखो रुपयांची उलाढाल होऊन स्थानिक शेतकरी या व्यवसायातून सुखावले आहेत.



# आगरी लस्सीची चव न्यारी!

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा येथील आगरी-कोळी समाजाच्या वेगवेगळ्या लज्जतदार खाद्यपदार्थांसाठीही ओळखला जातो, परंतु येथे आगरी लस्सी हा नवा ब्रँड तयार झाला आहे. विशेष म्हणजे एक महिला हा व्यवसाय चालवत आहेत. असंख्य लोक येथे येऊन आगरी लस्सीचा आस्वाद घेऊन तृप्त होतात. याशिवाय आगरी मसाला ताक, गाईचे व म्हशीचे आगरी सात्विक तूप आणि आगरी खरवसदेखील प्रसिद्ध आहे.




मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील आमटेम हे गाव आहे आणि या गावातच आगरी लस्सी ब्रँडचा जन्म झाला. आगरी लस्सीचे छोटे दुकान येथे आहे व बाजूला म्हात्रे डेअरी आहे. महामार्गावरून येणारे अनेक जण येथे आगरी लस्सीचा फलक पाहून आवर्जून थांबतात. या ब्रँडच्या निर्मात्या अनिता म्हात्रे या येणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला स्मितहास्य आणि नम्रपणे आपल्या स्वतःच्या हाताने बनवलेली लस्सी मातीच्या कुल्हडमध्ये देतात. सोबतीला त्यांचा मुलगादेखील असतो.

अनिता म्हात्रे यांचे पती शेती करतात, तर मोठा मुलगा मितेश याचे ज्वेलरीचे दुकान आहे. दुसरा मुलगा कल्पेश हा म्हात्रे डेअरी चालवतो. दोन मुलींची लग्न झाली आहेत. तीन वर्षांपूर्वी त्यांनी म्हात्रे डेअरी नावाने डेअरीचा व्यवसाय सुरू केला. त्याचवेळी येथे काही स्पेशल करण्याचा विचार केला व लस्सी बनवण्याचे ठरले. नुसती लस्सी विकण्यापेक्षा तिला स्थानिक टच आणि नाव देण्यात यावे असा विचार त्यांनी केला. मग अनिता यांचा मुलगा मितेश याने आगरी लस्सी हे नाव दिले. लस्सीची चव, ग्राहकांचे आदरातिथ्य व स्वच्छता यामुळे आगरी लस्सी ब्रँड प्रसिद्ध झाला. नाव वाचूनच लोक ही लस्सी टेस्ट करण्यासाठी येतात व तृप्त होतात.

उन्हाळ्याचा हंगाम, गणपती सण व ऑक्टोबर हिटमध्ये मोठ्या प्रमाणात या लस्सीची विक्री होते. दिवसाला पाच हजारपर्यंत कमाई होते, तर इतर दिवशी हजार ते बाराशे रुपये उत्पन्न मिळते. यातून अनिता यांचे घर चालते.

आगरी लस्सीचे वेगळेपण काय असे विचारल्यावर अनिता म्हात्रे सांगतात की, या लस्सीत आम्ही बाहेरचे कोणतेच पदार्थ वापरत नाही. फक्त साखर व वेलची घेतो. मागणीनुसार ड्रायफ्रुड टाकले जातात. लस्सीसाठी लागणारे दही तसेच मलई अनिता स्वतः बनवतात आणि लस्सीदेखील स्वतःच्या हाताने तयार करतात. दही बनविण्यासाठी गावठी म्हशीचे दूधच वापरले जाते. ही लस्सी घट्ट आणि चविष्ट असते. आगरी मसाला ताक, गाईचे व म्हशीचे आगरी सात्विक तूप आणि आगरी खरवस हे जिन्नससुद्धा अनिता स्वतः बनवितात. या उत्पादनांनाही खूप मागणी आहे.

# एक्सप्रेस वेवर अपघात, एक ठार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर शनिवारी (दि.९) पहाटेच्या सुमारास बोरघाटात एका मालवाहू ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने त्याने समोरील बाजूस प्रवास करणाऱ्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की या ट्रकची केबिन पूर्णतः दबून त्यात सहचालक अडक गंभीर जखमी होत जागीच मृत्युमुखी पडला.

सुरेश यादव (वय ३५, रा. उत्तर प्रदेश) असे मयताचे नाव आहे. अपघाताची महिती मिळताच बोरघाट पोलीस, देवदूत यंत्रणा, अपघातग्रस्त टीमचे सदस्य, आयआरबी टीम हे तत्काळ घटनास्थळी दाखल होत क्रेनच्या सहाय्याने केबिनमध्ये अडकलेले शव बाहेर काढन्यात आले व खोपोली नगरपालिकेच्या दवाखान्यात पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले, तर दोन्ही ट्रक रस्त्याच्या बाजूला घेऊन एक्स्प्रेस वे वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात आला. खोपोली पोलीस पुढील प्रक्रिया करीत आहेत.

# शेणवई केंद्राचा बाल मेळावा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील शेणवई केंद्राचा बाल मेळावा काळकाई माता मंदिर परिसरात मोठ्या जल्लोषात व उत्साहात झाला.

पाहुण्यांचे आगमन लेझीम पथकासह ढोल ताशांच्या गजरात झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रतापअण्णा देशमुख, राम गिजे, भावेश पाटील, भारत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वावे पोटगे शाळेची विद्यार्थिनी काव्या किरण साळसकर, तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून शेणवई शाळेची ईशा राजेंद्र मढवी हिला मान मिळाला. केंद्र प्रमुख विजय वेळे व सहकारी शिक्षकांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्री. वेळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या वेळी केंद्रातील प्रत्येक शाळेतील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यात डोंगरी शाळा, यशवंतखार शाळा व झोळांबे कोपरे शाळा यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकाविले. स्पर्धे कारिता परीक्षक म्हणून कलावती काटले, पल्लवी खांडेकर व संध्या मढवी यांनी काम पहिले. त्यानंतर मुलांनी गाणी गायली.

जेवणानंतर मुला-मुलींच्या पहिली ते चौथी व पाचवी ते सातवी असे गटनिहाय विविध फनी गेम्स घेण्यात आले. शेवटी संध्याकाळी ४.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमातील विजेत्या शाळा व सर्व शाळांना सहभागाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती व पालक वर्ग वावे पोटगे यांच्याकडून ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. विविध स्पर्धे तील विजेत्यांनाही पारितोषिके देण्यात आली.

वावे पोटगे शाळेचे मुख्याध्यापक गणेश भोईर, शंकर जाधव, समीर जुवेकर, सौ. सुर्वे, सौ. वाणी, सौ. भोईर, सौ. गायकवाड, सौ. जुवेकर, सौ. खांडेकर, सौ. देशमुख, विजय राठोड, श्री. राळे, श्री. वावेकर, सौ. गावंड, श्री. डोलारे, श्रीमती कोडे व कुलकर्णी यांच्यासह इतरांनी मेहनत घेऊन बाल मेळावा यशस्वी केला. सूत्रसंचालन समीर जुवेकर यांनी केले.



# पाचव्या कसोटीत भारताचा डावाने विजय

## इंग्लंड निष्प्रभ; दुसऱ्या डावात अश्विनचे पाच बळी

**धरमशाला : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना धरमशाला येथे खेळला गेला. या सामन्यातही भारताने गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही विभागात दमदार प्रदर्शन करताना इंग्लंडचा एक डाव आणि ३२ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्याची मालिका ४-१ने खिशात घातली. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना २१८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताने ४७७ धावा करत २५९ धावांची आघाडी घेतली. यानंतर दुसऱ्या डावात इंग्लंडचा संघ १९५ धावांवर गारद झाला. १००वी कसोटी खेळणाऱ्या अश्विने सर्वाधिक नऊ विकेट्स घेत विजयात महत्त्वाची भूमिका निभावली.




इंग्लंडचा संघ शनिवारी (दि.९) दुसऱ्या सत्रात गडगडला. शंभरावी कसोटी खेळणाऱ्या रविचंद्रन अश्विनने पहिल्या डावात चार आणि दुसऱ्या डावात पाच बळी घेतले. रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी शतकी खेळी केली. पहिल्या कसोटीत टीम इंडियाचा पराभव झाला होता, पण त्यानंतर रोहित आणि कंपनीने जबरदस्त पुनरागमन करीत उर्वरित चारही सामने जिंकले.

इंग्लंडकडून दुसऱ्या डावात जो रूटने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ८४ धावांची खेळी केली, पण इंग्लंडचा टॉप ऑर्डर पुन्हा सपशेल अपयशी ठरली. सलामीवीर झॅक क्रॉऊली एकही धाव न काढता अश्विनच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. बेन डकेट २ व ऑली पोप १९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये गेला. जॉनी बेअरस्टोने ३९ धावांची छोटी पण चांगली खेळी केली. इंग्लिश कर्णधार बेन स्टोक्स २ धावा करून बाद झाला. त्यानंतर बेन फॉक्सला अश्विनने क्लीन बोल्ड केले. दुसऱ्या डावात भारतासाठी अश्विन हा सर्वांत यशस्वी गोलंदाज ठरला. अश्विनने पाच फलंदाजांना बाद केले. जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांना प्रत्येकी दोन विकेट्स मिळाल्या, तर रवींद्र जडेजाने एक गडी बाद केला.

भारतीय संघाने पहिल्या डावात ४७७ धावा केल्या होत्या. अशा प्रकारे भारताला २५९ धावांची मोठी आघाडी मिळाली. भारताकडून रोहित शर्माने १०३ धावा केल्या. तर शुभमन गिलने ११० धावांचे योगदान दिले. याशिवाय देवदत्त पडिक्कल आणि सर्फराझ खान यांनी अर्धशतक केले. इंग्लंडकडून शोएब बशीर सर्वांत यशस्वी गोलंदाज ठरला. शोएबने ५ विकेट्स घेतल्या. जेम्स अँडरसन आणि टॉम हार्टलीने प्रत्येकी एक विकेट घेतली.

### रोहित ब्रिगेडचा पराक्रम

भारतीय संघाने धरमशाला येथील पाचवा कसोटी सामना जिंकून आणखी एक मोठा पराक्रम आपल्या नावावर केला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ११२ वर्षांनंतर एखाद्या संघाने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना गमावल्यानंतर सलग चार सामने जिंकले. इंग्लंडने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १९१२मध्ये हा इतिहास रचला होता. इंग्लंडच्या आधी ऑस्ट्रेलियाने ही कामगिरी केली होती. कांगारू संघाने १८९७-९८ आणि १९०१-०२मध्ये इंग्लंडविरुद्ध असा पराक्रम केला होता. आता या यादीत रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचाही समावेश झाला आहे.

# सीनियर संघासाठी कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना

## भारताच्या ऐतिहासिक विजयानंतर जय शाह यांची मोठी घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत इंग्लंडविरुद्ध ४-१ असा विजय मिळवला. धरमशाला येथे सुरू असलेल्या पाचव्या कसोटीत तिसऱ्याच दिवशी इंग्लंडचा निकाल लागला. भारताने एक डाव व ६४ धावांनी सामना जिंकला. या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांनी मोठी घोषणा केली.

’सीनियर टीमसाठी कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना सुरू केल्याची घोषणा करताना मला आनंद होत आहे, जे आमच्या प्रतिष्ठित खेळाडूंना आर्थिक वाढ आणि स्थिरता प्रदान करण्याच्या उद्देशाने एक पाऊल आहे. २०२२-२३ हंगामापासून सुरू होणारी कसोटी क्रिकेट प्रोत्साहन योजना ही कसोटी सामन्यांसाठी दिल्या जाणाऱ्या १५ लाखांच्या मॅच फीव्यतिरिक्त असणार आहे, असे जय शाह



यांनी एक्सवर म्हटले केले.

वर्षाला नऊ कसोटी सामने गृहीत धरल्यास, जे खेळाडू ५० टक्क्यांपेक्षा कमी सामने खेळतील त्यांना प्रोत्साहनपर रक्कम मिळणार नाही. जे खेळाडू ५० टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजेच पाच ते सहा कसोटी सामने खेळतील त्यांना प्रती सामना ३० लाख इन्सेंटीव्ह मिळेल. ज्यांचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश नसेल, पण ते उपलब्ध असतील त्यांना प्रती सामना १५ लाख मिळतील. हीच टक्केवारी ७५ टक्क्यांच्या वर झाल्यास प्लेइंग इलेव्हनमधील खेळाडूला ४५ लाख मिळतील.

# रणजी चषक स्पर्धेची आजपासून फायनल




**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय देशांतर्गत क्रिकेटमध्ये महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या रणजी चषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना रविवार (दि.१०)पासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातीलच दोन संघ मुंबई आणि विदर्भ यंदा या चषकावर नाव कोरण्यासाठी एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत.

उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात मुंबईने तामिळनाडूवर डावाने विजय साकारला, तर दुसऱ्या सामन्यात विदर्भने मध्य प्रदेशवर मात केली. देशांतर्गत स्पर्धांमध्ये ‘दादा’ संघ अशी मुंबईची ओळख होती. मुंबईने विक्रमी ४१ वेळा रणजी चषकावर आपले नाव कोरले आहे. यात १९५८-५९ ते १९७२-७३ अशा सलग १५ जेतेपदांचाही समावेश आहे, मात्र गेल्या काही काळापासून मुंबईचा संघ आपले हे वर्चस्व हरवून बसला आहे. मुंबईला २०१५-१६ च्या हंगामानंतर रणजी करंडक उंचावता आलेला नाही. आठ वर्षांपासूनचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची मुंबईला यंदा संधी आहे. दुसरीकडे विदर्भाच्या नावावर विजेतेपद असून पदकांची संख्या वाढवण्याचा ते प्रयत्न करतील.

# कसोटी मालिकेत षटकारांची बरसात

**नवी दिल्ली** : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या गेलेल्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत उभय संघांच्या खेळाडूंनी वनडे शैलीत फलंदाजी केली आणि १००हून अधिक षटकार मारले.

याआधी वनडे आणि टी-२० फॉरमॅटमध्ये असे घडले आहे. विशेष म्हणजे तिन्ही फॉरमॅटमध्ये दोनदा भारत आणि इंग्लंडचा संघ होता. वनडे फॉरमॅटमध्ये २०१३मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांनी मिळून पहिल्यांदाच १०० षटकार मारले गेले होते.

# डब्ल्यूपीएलमध्ये यूपीचा थरारक विजय

## दिल्लीवर एका धावेने मात; दीप्ती शर्माची हॅट्ट्रिक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीगमध्ये शुक्रवारी झालेल्या रोमांचक सामन्यात यूपी वॉरियर्सने दिल्ली कॅपिटल्सचा एका धावाने पराभव केला. यूपीची स्टार फिरकीपटू दीप्तीने या सामन्यात हॅट्ट्रिकसह एकूण चार विकेट घेतल्या.

यूपी वॉरियर्सची स्टार फिरकीपटू दीप्ती शर्माने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध हॅट्ट्रिक घेत इतिहास रचला. या लीगमध्ये हॅट्ट्रिक घेणारी दीप्ती पहिली खेळाडू ठरली आहे. दीप्तीच्या चमकदार कामगिरीची सुरुवात कॅपिटल्सची कर्णधार मेग लॅनिंगला लेग-बिफोर विकेटद्वारे बाद करून झाली. १९व्या षटकात दीप्तीला गोलंदाजी करण्याची संधी मिळाली. लॅनिंगनंतर तिने अप्रतिम गोलंदाजी करीत नाबेल सदरलँड आणि अरुंधती रेड्डी यांच्या विकेट घेतल्या.



दीप्तीने कधी हॅट्ट्रिक घेतली हे मैदानापासून समालोचनापर्यंत कोणालाच कळले नाही. दिल्लीला यूपीकडून एका धावेने पराभूत करण्यात या विकेट्सनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दीप्ती शर्माला सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले, जिने ४८ चेंडूंत एक षटकार आणि सहा चौकारांच्या मदतीने ५९ धावा करीत संघाची धावसंख्या १३८पर्यंत नेली, तर गोलंदाजीत चार विकेट्सही घेतल्या. दीप्ती ही महिला प्रीमियर लीगच्या इतिहासात मुंबई इंडियन्सच्या इझी वोंगनंतर हॅटट्रिक घेणारी दुसरी खेळाडू ठरली. वोंगने गेल्या वर्षी एलिमिनेटरमध्ये वॉरियर्सविरुद्ध ही कामगिरी केली होती. विशेष म्हणजे त्या हॅटट्रिक विकेटमध्ये दीप्तीचाही सहभाग होता.

वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना आठ गडी गमावून १३८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दिल्लीचा संघ १९.५ षटकांत १३७ धावांवर संपुष्टात आला.

# कर्णधार रोहित शर्माकडून युवा खेळाडूंचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

कसोटी मालिकेत इंग्लंडविरुद्ध मोठा विजय मिळवल्यानंतर भारतीय कर्णधार रोहित शर्माने आनंद व्यक्त केला. पहिला सामना जिंकल्यानंतर इंग्लंडने सलग चार सामने गमावले. शनिवारी अखेरचा कसोटी सामना जिंकून टीम इंडियाने मालिका ४-१ अशा फरकाने आपल्या नावावर केली. भारताने मालिकेतील अखेरचा अर्थात पाचवा कसोटी सामना एक डाव आणि ६४ धावांनी जिंकला. भारताने पहिल्या डावात धावांचा डोंगर उभारल्यानंतर इंग्लंडकडून जो रूटने एकट्याने खिंड लढवली, पण त्याला कुलदीप यादवने बाद करून इंग्लिश संघाला १९५ धावांत गुंडाळले. विजयानंतर रोहित शर्माने आपल्या संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले आणि त्यांच्या खेळीला दाद दिली.

रोहित शर्मा म्हणाला की, संघाने सांघिक खेळी केल्याने हा विजय मिळाला. या संघातील खेळाडूंकडे कदाचित अनुभव कमी असावा, पण त्यांनी खूप क्रिकेट खेळले आहे. त्यामुळे मी नक्कीच



सांगू शकतो की, दबावाखाली ते खूप चांगल्या पद्धतीने खेळू शकतात. याचे श्रेय संपूर्ण संघाला जाते आणि ते पाहून मला आनंद झाला. आपण जेव्हा अशी मालिका जिंकतो तेव्हा सर्वजण बोलतात सामना जिंकण्यासाठी धावा आणि शतके झळकावण्याची गरज असते, मात्र कसोटी जिंकण्यासाठी २० बळी घेणे महत्त्वाचे असते. गोलंदाजांनी ज्या पद्धतीने जबाबदारी घेतली ते पाहून आनंद झाला.

कुलदीप यादवने चांगली कामगिरी केली, त्याच्यात खूप क्षमता आहे. दुखापतीनंतर तो परत आला आणि एनसीमध्ये काम केले. तो खूप मेहनत घेत आहे आणि सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे त्याची फलंदाजी. यशस्वी जैस्वालला खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. त्याने या मालिकेत दमदार खेळी केली असून त्याला मोठी धावसंख्या करायला आवडते, असेही भारतीय कर्णधार रोहित शर्माने सांगितले.




# ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी गौरव, प्राची पात्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या गौरव भोसले आणि प्राची देवकर यांनी लखनौ येथे सुरू झालेल्या ज्युनिअर फेडरेशन करंडक ॲथलेटिक्स स्पर्धेत तीन हजार मीटर शर्यतीत पात्रता निकष पार करीत अनुक्रमे सुवर्ण व रौप्यपदक जिंकले. पात्रता निकष पार केल्याने दोघांची दुबई येथे पुढील महिन्यात होणाऱ्या आशियाई ज्युनिअर थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड पक्की मानली जात आहे.

मध्य रेल्वेत कार्यरत असलेले व शिवछत्रपती पुरस्कार विजेते भास्कर भोसले यांचा मुलगा असलेल्या गौरवने लखनौ येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या सिंथेटिक ट्रॅकवर झालेल्या २० वर्षांखालील मुलांच्या तीन हजार मीटर शर्यतीत ८ मिनिटे ४०.१३ सेकंद अशी वेळ देत सुवर्णपदक जिंकले. या कामगिरीमुळे त्याने आशियाई ज्युनिअर स्पर्धेसाठी असलेली ९ मिनिटे १६.०० सेकंदाची पात्रताही पार केली. विशेष म्हणजे प्रथम सहा धावपटूंनी हे निकष पार केले.

मुलींच्या तीन हजार मीटर शर्यतीत सातारा जिल्ह्यातील असलेल्या प्राची देवकरने रौप्यपदक जिंकताना ९ मिनिटे ५३.७६ सेकंद अशी वेळ दिली. या शर्यतीत १० मिनिटे ००.६९ सेकंद अशी पात्रता होती. गेल्या वर्षी झालेल्या राष्ट्रीय क्रॉस कंट्री स्पर्धेत तिने १८ वर्षांखालील वयोगटात सुवर्णपदक जिंकले होते.

# पॅरालिम्पिक समितीचे झाझरिया नवे अध्यक्ष

**नवी दिल्ली** : भारतीय पॅरालिम्पिक समितीचे नवे अध्यक्ष म्हणून देवेंद्र झाझरिया यांची निवड झाली आहे. त्यांनी जवळपास २२ वर्ष पॅरा ॲथलेट्स म्हणून भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

काही दिवसांपूर्वी झाझरिया यांनी खेळातून निवृत्ती जाहीर केली होती. त्यांनी जेव्हा पॅरालिम्पिक समितीच्या अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला होता तेव्हाच त्यांची उमेदवारी निश्चित झाली होती. त्यांच्याशिवाय इतर कोणाही व्यक्तीने यासाठी अर्ज केला नव्हता. अखेर शनिवारी (दि.९) त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा झाली.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com